cmyk

## संपादकीय

### काँग्रेसमध्ये विचारमंथन: हे ही नसे थोडके

अहमदाबादमध्ये काँग्रेसचे ८४ वे अधिवेशन नुकतेच पार पडले. या दोन दिवसीय अधिवेशनात वैचारिक देवाण-घेवाण झाली. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपा आणि आरएसएसवर सडकून टीका केली. आम्ही जाती आधारित जनगणना करण्याची मागणी केली पण पंतप्रधान मोदी यांनी ती मान्य केली नाही. आम्ही सत्तेत आल्यावर जाती आधारित जनगणनेचा कायदा मंजूर करू असे राहुल गांधी म्हणाले. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक भाजपने कटकारस्थान रचून जिंकल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. येणाऱ्या काळात देशात बदल घडणार आहे. लोकांचे मत बदलत आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### जम्मू काश्मीमध्ये सुरक्षादलाचे कोम्बिंग ऑपरेशन : १ दहशतवादी ठार

श्रीनगरः जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईमध्ये एक दहशतवादी ठार झाला आहे. उधमपूर व किश्तवाड येथे शुक्रवारी राबवलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये हा दहशतवादी ठार झाला. अन्य तिनजणांची शोध मोहिम सुरु असल्याची माहिती सुरक्षादलांनी दिली आहे. दोडा जिल्ह्यातील भादेवाडा परिसरात सुरक्षा एजन्सीजनी शोध मोहिम राबविली जात होती. त्यावेळी जंगलात दहशतवादी त्यांचे लोकेशन वारंवार बदलत होते. त्यानंतर सैन्यदल व काश्मीर पोलिसांनी संयुक्त शोधमोहिम राबविली जात होती. यावेळी ठिकाण बदलत असताना त्यांची दहशतवाद्यांशी चकमक झाली. यामध्ये १ दहशतवादी ठार झाला तर तिघे जंगलात लपले आहेत. त्यांना पकडण्यासाठी शोधमाहिम राबविली जात आहे. दरम्यान एका आर्मी ऑफिसरने सांगितले की दोन्ही बाजूनी जोरदार

बीड - महाराष्ट्र | वर्ष -४ | अंक-३४७ | शनिवार, दि.१२ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# शेतकरी बेहाल तर पीकविमा कंपन्या मालामाल

**मुंबई । प्रतिनिधी**

**पीकविम्यातून शेतकरी कंगाल;पीकविम्यातून शेतकरी कंगाल, तर कंपन्या आर्थिकदृष्ट्या मालामाल झाल्याचे समोर आले आहे. पीकविमा नफ्यातून कंपन्यांना देशभरात तब्बल ५० हजार कोटींच्या खिरापतीचा लाभ मिळाला. एकट्या महाराष्ट्रातून या कंपन्यांना तब्बल साडे दहा हजार कोटींचा नफा झाल्याचे समजते.**




नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी देशोधडीला लागतो. अतिवृष्टी, पूर, वादळी वारे, भूस्खलन सारख्या नैसर्गिक संकटामुळे पिकांचे नुकसान होते. यातून शेतकरी सावरावा यासाठी केंद्र सरकारने २०१६-२०१७ पासून पंतप्रधान पीकविमा (पीएमएफबीवाय) सुरू केली. मात्र, या योजनेच्या हेतूलाच हरताळ फासला असून पीकविमा कंपन्याच मालामाल होत असल्याचे समोर येत आहे. नैसर्गिक संकट, अवकाळी पाऊस, ओला दुष्काळ, पिकांवर पडणारे रोगांमुळे अनेकदा हातातोंडाशी आलेले पीक शेतक-यांच्या घरी येत नाही. त्यामुळे या नुकसानीची भरपाई मिळावी म्हणून पंतप्रधान पीकविमा योजना सुरू करण्यात आली. या योजनेत विमा हप्त्याच्या २ टक्के नगदी पिकांसाठी ५ पान २ वर

## कंपन्यांना सुमारे ११ हजार कोटींचा नफा

### ८ वर्षांत ४३ हजार कोटींचा हप्ता?

पंतप्रधान पीकविमा योजनेची महाराष्ट्रात २०१६-२०१७ पासून लागू झाली. विमा कंपन्यांना २०१६-२०२४ ते आठ वर्षांच्या काळात केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार आणि शेतक-यांकडून एकूण ४३ हजार २०१ कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. मात्र, यात कंपन्यांनी भरपाई पोटी ३२ हजार ६१० कोटी रुपये रक्कम शेतकऱ्यांना वाटली. त्यात कंपन्यांना तब्बल १० हजार ५९१ कोटींचा नफा एकट्या महाराष्ट्रातून मिळाला.

### कंपन्यांना ७५ टक्के लाभ

महाराष्ट्रात २०२०-२०२१ या वर्षात तर विम्या कंपन्या आर्थिकदृष्टया भयंकर गब्बर झाल्या. त्यांनी शेतक-यांना फक्त २५ टक्के रक्कम भरपाई म्हणून दिली. तर विमा कंपन्यांचा नफा ७५ टक्क्यांवर गेला. विमा कंपन्यांना या वर्षात केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार आणि शेतक-यांकडून एकूण ५ हजार ८०६.२१ कोटी रुपयांचा विमा हप्ता मिळाला. या कंपन्यांनी फक्त १ हजार ४३१.३४ कोटी रुपये रक्कम शेतक-यांना वाटली. त्यामुळे कंपन्यांना एकाच वर्षात ४ हजार ३७४.८७ कोटी रुपयांचा फायदा झाला.

# प्रशांत कोरटकरच्या सुटकेसाठी व्हीआयपी व्यवस्था

## काळ्या फिल्मिंगची गाडी अन् राजेशाही थाट



**कोल्हापूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्यावर आक्षेपार्ह वक्तव्ये करून वादात सापडलेल्या प्रशांत कोरटकरची कळंबा कारागृहातून जामिनावर सुटका झाली. मात्र, त्याला काळ्या फिल्मिंगच्या गाडीतून राजेशाही थाटात बाहेर काढल्याने कोल्हापूर पोलिसांवर संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी प्रजासत्ताक सेवा संस्थेचे दिलीप देसाई यांनी पोलिस अधीक्षक आणि प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करत कठोर कारवाईची मागणी केली आहे.

प्रशांत कोरटकरने छत्रपतींविरोधात आक्षेपार्ह वक्तव्ये केल्याने महाराष्ट्रभर संतापाची लाट पसरली होती. त्याला अटक करून प्रथम पोलीस कोठडी आणि नंतर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. शुक्रवारी जामिनावर सुटका होताच कोल्हापूर पोलिसांनी त्याच्यासाठी कडेकोट बंदोबस्त ठेवला. मात्र, सुटकेसाठी पान २ वर

# लोकांचे मूलभूत हक्क लक्षात घ्या

## सर्वोच्च न्यायालयाने ईडीला फटकारले




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) लोकांच्या मूलभूत हक्कांचा विचार करावा, अशी टिप्पणी करत शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने तपास संस्थेला सुनावले. छत्तीसगडमधील नागरिक आपूर्ती निगम (एनएएन) घोटाळा प्रकरण छत्तीसगडहून नवी दिल्लीला हस्तांतरित करण्याची मागणी करणाऱ्या ईडीच्या याचिकेवर न्यायालयाने ही टिप्पणी केली.**


न्यायमूर्ती अभय एस. ओका आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठाने ईडीच्या वकिलांना सवाल केला की, त्यांनी घटनेच्या कलम ३२ अंतर्गत रिट याचिका कशी दाखल केली कारण कलम ३२ अंतर्गत याचिका दाखल करण्याचा मूलभूत अधिकार व्यक्तींना आहे, संस्थेला नाही. यानंतर अतिरिक्त महाधिवक्ता एस. व्ही. राजू यांनी याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली आणि सांगितले की ईडीलाही मूलभूत अधिकार आहेत. यावर खंडपीठाने म्हटले की, जर ईडीला मूलभूत अधिकार आहेत, तर त्यांनी लोकांच्या मूलभूत अधिकारांचाही विचार करावा. यानंतर न्यायालयाने ईडीला याचिका मागे घेण्याची परवानगी दिली. दरम्यान, २०१५ मध्ये, छत्तीसगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) साठी पान २ वर

# अण्णाद्रमुक-भाजप आघाडीची घोषणा

## गृहमंत्री अमित शहा यांची उपस्थिती

**चेन्नई । वृत्तसंस्था**

**शहा यांनी अण्णाद्रमुक आणि भाजप आघाडीची घोषणा केली. ही आघाडी एकत्रितरित्या निवडणुकांना सामोरे जाईल. यावेळी अण्णाद्रमुकचे नेते पलानीस्वामी आणि भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई सोबत होते. दरम्यान, आघाडीचे नेतृत्व पलानीस्वामींकडे असेल, असेही शहा म्हणाले.**



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काही दिवसांपुर्वी तामिळनाडूतून द्रमुकचा सुपडासाफ करणार, असे वक्तव्य केले होते. त्यानंतर आता शुक्रवारी (दि.११ एप्रिल) अमित शहा तामिळनाडू दौऱ्यावर असताना त्यांनी पुढील वर्षी होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पहिला डाव टाकला आहे. शहा म्हणाले, राष्ट्रीय स्तरावरील निवडणुका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील, तर तामिळनाडू पान २ वर

# गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजने अंतर्गत गाळ उपसा करण्यास परवानगी

## शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा-आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

**गाळ मुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत मध्यम प्रकल्पातील साचलेला गाळ उपसा करण्यास परवानगी मिळाली असून महाराष्ट्र शासनाच्या मृत व जलसंधारण विभागाने याबाबतचा आदेश जा.क्र. ८५७/२०२५ दि. ११ एप्रिल २०२५ काढला असून दिनांक १३ किंवा १४ एप्रिल रोजी मध्यम प्रकल्पातील गाळ काढणे या कामाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेअंतर्गत प्रकल्पातील गाळ आपल्या शेतात टाकून घ्यावा असे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले आहे.**



आष्टी तालुक्यातील अनेक मध्यम प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला आहे. हा गाळ काढून शेतकऱ्यांच्या शेतात पसरवण्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार असून तलावांच्या पाण्यासाठी वाढ होणार असल्यामुळे अशा दुहेरी उद्देशातून गाळ मुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार या योजनेची अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा करत असताना माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि संबंधित विभागाचे पान २ वर

# ई-ट्रान्सीट हा शहर वाहतुकीसाठी चांगला पर्याय - मुख्यमंत्री

**पुणे । प्रतिनिधी**

शहरी वाहतूक व्यवस्थेसाठी ई-ट्रान्सीट हा एक चांगला पर्याय असून यासाठी अधिकाऱ्यांनी आर्थिक बाजू तपासून याबाबतचा अहवाल सादर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. पिंपरी-चिंचवड महानगर क्षेत्रात प्रायोगिक तत्वावर ई-ट्रान्सीट सुरू करण्याविषयी हेस-एजी कंपनीच्या प्रतिनिधींसोबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक संपन्न झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासणे गरजेचे असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कंपनीने त्यांची उत्पादने भारतात तयार करावीत, जेणेकरुन उत्पादन खर्च कमी होऊन प्रकल्प खर्चातही बचत होईल. कमी किंमतीमध्ये एक चांगली शहर वाहतूक व्यवस्था कंपनीने उपलब्ध करून दिल्यास राज्यातील किमान १० शहरांसाठी असे प्रकल्प उभारता येतील. त्यासाठी कंपनीने त्यांच्या ई-ट्रान्सीट बसेसचे उत्पादन देशातच सुरू करावे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात हा प्रकल्प सुरू करण्याविषयी सविस्तर अहवाल सादर करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

# माजलगावात दोन जुगार अड्ड्यावर छापा

**माजलगांव । प्रतिनिधी**

येथील शहर पोलीसांना मिळालेल्या बातमीच्या आधारे पोलीसांनी माजलगांव शहरातील बाजार रोड परीसरात दोन ठिकाणी छापा मारुन कल्याण नावाचा मटका जुगार खेळवणारे विकास भारत डोलारे रा.फुलेनगर माजलगांव,मुन्ना इसाक शेख रा. आयेशा नगर माजलगांव यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन कल्याण मटका जुगाराचे साहीत्य व नगदी ९९३०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.तसेच मटका जुगार खेळवणारे १) विकास भारत डोलारे रा. फुलेनगर माजलगांव तसेच बुकीमालक मुनीर शकुर कुरेशी रा. माजलगांव,आसेफ शेख पान २ वर

# महिलांची पहिली शाळा थोरले प्रतापसिंह महाराज यांनी सुरु केली! उदयनराजे भोसलेंच्या विधानाने वाद

**सातारा । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त साताऱ्यातील फुलेवाड्यात खासदार उदयनराजे भोसले यांनी केलेल्या वक्तव्याने नवा वाद उफाळला आहे. थोरले प्रतापसिंह महाराज यांनी सर्वप्रथम आपल्या राजवाड्यात स्त्री शिक्षणाची शाळा सुरू केली आणि महात्मा फुले यांनी त्यांचे अनुकरण केले, असा दावा उदयनराजेंनी केला. या वक्तव्यावर ओबीसी नेते मंगेश ससाने आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र टीका केली आहे.



उदयनराजे म्हणाले, ''स्त्री शिक्षणाची पहिली शाळा थोरले प्रतापसिंह महाराज यांनी स्वत:च्या राजवाड्यात सुरू केली. एका दृष्टिकोनातून पाहिल्यास, महात्मा फुले यांनी त्यांचे अनुकरण केले. या राजवाड्यातच पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण झाले.'' या वक्तव्याने महात्मा फुले यांच्या योगदानावर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, ओबीसी नेते मंगेश ससाने यांनी उदयनराजेंच्या दाव्यावर उपहासात्मक टीका केली. ते म्हणाले, ''महात्मा फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी भिडेवाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली, हे सत्य आहे. पण उदयनराजेंनी नवा शोध लावला आहे. यामुळे सगळे इतिहासकार आणि संशोधक फेल ठरले. हे वक्तव्य महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्रांतीच्या इतिहासाला धक्का देणारे आहे. तसेच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही पान २ वर

# बजाज ऑटोचे संचालक मधुर बजाज यांचे निधन

**मुंबई । प्रतिनिधी**

बजाज ऑटोचे संचालक मधुर बजाज (वय ६३) यांचे शुक्रवारी (दि.११) पहाटे निधन झाले. काही दिवसांपूर्वी पक्षाघात झाल्यानंतर प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांनी पहाटे ५ च्या सुमारास अखेरचा श्वास घेतला. २४ जानेवारी २०२४ रोजी त्यांनी प्रकृतीच्या कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. मधुर बजाज यांनी ३५ हजार कोटींपेक्षा जास्त किमतींची मालमत्ता मागे सोडली आहे. फोर्ब्सच्या मते, त्यांची एकूण संपत्ती सुमारे ४.१ अब्ज असल्याचा अंदाज आहे. ते बजाज ग्रुपमध्ये भागीदारी असलेल्या बजाज कुटुंबातील सदस्यांपैकी एक आहेत.



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: १३४.५० क्विंटल** | | |
| २,००० | ३,०७० | २,५५५ |
| **ज्वारी/हायब्रिड: ३७९.०० क्विंटल** | | |
| १,७५१ | ३,२०१ | २,४०६ |
| **मका/लोकल:३०.०० क्विंटल** | | |
| २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| **तूर : ११.५० क्विंटल** | | |
| ६,५५० | ७,१५० | ६,९५५ |
| **उडीद : १.०० क्विंटल** | | |
| ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| **बाजरी: १२९.५० क्विंटल** | | |
| २,०७० | २,७५१ | २,४८० |
| **मुग :४.५० क्विंटल** | | |
| ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| **सोयाबीन:१७१.५० क्विंटल** | | |
| ४,४२५ | ४,५११ | ४,४७१ |
| **हरभरा: ६.०० क्विंटल** | | |
| ५,५०० | ५,५९० | ५,५४७ |

# एसटी कर्मचाऱ्यांचे उर्वरित ४४ टक्के वेतन येत्या मंगळवारपर्यंत

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्न सूटला

**मुंबई । प्रतिनिधी**

**एसटी कर्मचाऱ्यांचा उर्वरित ४४ टक्के पगार येत्या मंगळवार पर्यंत देण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासाठी पुढाकार घेऊन वित्त सचिवांशी केलेल्या चर्चेअंती एसटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन लवकरच अदा करण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे.**

एसटी कर्मचाऱ्यांना फक्त ५६ टक्के वेतन मिळाल्याचे वृत्त पसरल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली होती. शुक्रवारी सांगोला तालुक्याच्या दौऱ्यावर असताना उपमुख्यमंत्री शिंदे यांची काही एसटी कर्मचाऱ्यांनी भेट घेऊन आपले उर्वरित वेतन लवकरच देण्याची मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेऊन या प्रश्नावर शिंदे यांनी राज्याचे वित्त सचिव ओमप्रकाश गुप्ता यांच्याशी फोनवरून चर्चा केली. या चर्चेअंती एसटी कर्मचाऱ्यांचे या महिन्याचे उर्वरित ४४ टक्के वेतन येत्या मंगळवारपर्यंत अदा करण्यात येईल असे गुप्ता यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पुढाकाराने एसटी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांच्यावरील वेतन कपातीचे संकट दूर होण्यास मदत झाली आहे.




cmyk

## अग्रलेख

# काँग्रेसमध्ये विचारमंथन : हे ही नसे थोडके

अहमदाबादमध्ये काँग्रेसचे ८४ वे अधिवेशन नुकतेच पार पडले. या दोन दिवसीय अधिवेशनात वैचारिक देवाण-घेवाण झाली. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपा आणि आरएसएसवर सडकून टीका केली. आम्ही जाती आधारित जनगणना करण्याची मागणी केली पण पंतप्रधान मोदी यांनी ती मान्य केली नाही. आम्ही सत्तेत आल्यावर जाती आधारित जनगणनेचा कायदा मंजूर करू असे राहुल गांधी म्हणाले. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक भाजपने कटकारस्थान रचून जिंकल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. येणाऱ्या काळात देशात बदल घडणार आहे. लोकांचे मत बदलत आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेसच्या या अधिवेशनाला देशभरातून १७०० हून अधिक काँग्रेसचे प्रतिनिधी उपस्थित होते. काँग्रेस प्रतिनिधींना संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले, देश आता भाजपला कंटाळला आहे. बिहारच्या निवडणुकीत त्याचे प्रत्यंतर येईल. भाजपने महाराष्ट्रात निवडणूक कशी जिंकली ते तेथील लोकांना विचारा. महाराष्ट्रात ५० लाख मतदार अचानक कसे वाढू शकतात? महाराष्ट्रातील मतदारयाद्या आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाला मागितल्या होत्या पण त्या अजूनही मिळालेल्या नाहीत. ठोस विचार नसलेला राजकीय पक्ष संघासमोर उभा राहून वैचारिक लढा देऊ शकत नाही.

राष्ट्रवादाचा अर्थ प्रादेशिक अखंडता तर असतोच. यासोबत सामाजिक, राजकीय व आर्थिक सशक्तीकरणाचा देखील त्यामध्ये समावेश होतो. सर्व देशवासीयांना समान न्याय देणे, वंचित-पीडित-शोषितांच्या अधिकारांचे रक्षण करणे, सद्भावना व बंधुभावाच्या सुत्राने देश एकसंध ठेवणे आणि भारताचा बहुलतावादी व उदारमतवादी आचार, विचार व व्यवहार म्हणजे राष्ट्रवाद. काँग्रेसचा राष्ट्रवाद समाजाला जोडणारा आहे तर भाजपचा, संघाचा ढोंगी राष्ट्रवाद समाजाला तोडणारा, सत्तेसाठीचा संधिसाधू आहे. सत्ता मिळवण्यासाठी आणि ती टिकवण्यासाठी भाजप व संघ देशात धर्म, जात, भाषा, प्रांत, खाद्यसंस्कृती याच्या आधारावर दुही माजवत आहे असे ठरावात नमूद करण्यात आले आहे. काँग्रेसमध्ये संघटनात्मक बदल केले जात आहेत. जे पक्षाचे काम करत नाहीत. पक्षाची जबाबदारी घेत नाहीत अशांनी निवृत्त व्हावे. त्यांना आराम करण्याची गरज आहे, असे पक्षाध्यक्ष खरगे यांनी नेते व कार्यकर्त्यांना ठणकावून सांगितले. त्या दृष्टीने जिल्हा काँग्रेस बळकट केल्या जातील आणि जिल्हाध्यक्षांना व्यापक अधिकार दिले जातील. उमेदवार निवडीमध्ये त्यांचा सहभाग असेल असे खरगे यांनी स्पष्ट केले. ईव्हीएमवरून सरकारवर निशाणा साधताना खरगे म्हणाले, भाजपने असे तंत्रज्ञान बनवले आहे की ज्याचा त्यांना फायदा होईल आणि विरोधकांचे नुकसान होईल. आज आमचा पराभव होत असला तरी उद्या या देशाचे तरुण नक्की याविरोधात लढा देतील. देश सध्या एकाधिकारशाहीकडे जात आहे. सर्वसामान्य नागरिकांची संपत्ती हे सरकार आपल्या श्रीमंत मित्रांकडे हस्तांतरित करीत आहे. एकंदरीत प्रकार पाहता पंतप्रधान मोदी एक दिवस आपला देश विकून टाकतील. ते काही असो, काँग्रेसमध्ये आता विचारमंथन सुरू झाले हेही नसे थोडके.

# सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी आमदार निधी देणार-आ.खोतकर

## महात्मा फुले यांचे विचार वर्तमान व भविष्यातही गरजेचे-संतोष खांडेकर

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरात सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी शहर महापालिकेने जागा द्यावी व सदरील पुतळा उभारण्यासाठी लागेल तेव्हढा आमदार निधी देणार असल्याची ग्वाही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली. तर महात्मा जोतिबा फुले यांनी १९ व्या शतकात भारतीय समाजव्यवस्थेचे सूक्ष्म निरीक्षण करून समानतेचे विचार मांडले. त्यामुळे महात्मा फुले यांचे विचार वर्तमान व भविष्यकाळातही नितांत आवश्यक असल्याचे प्रतिपादन जालना शहर महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी दिले.**



महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती ११ एप्रिल २०२५ रोजी जालना शहर मनपा परिसरात लाडुचा प्रसाद वाटून उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी उभयंते बोलत होते. यावेळी पोलिस अधिक्षक अजयकुमार बंन्सल, केशव कानपुडे, उपायुक्त प्रियंका राजपुत, श्रीमती गायकवाड, जालना शहर मनपाचे कार्यालयीन अधिक्षक विजय फुलंब्रीकर, आनंद अंभोरे, राजेश कुरलिये, अरूण वानखेडे, अभियंता सऊद, बंडु चव्हाण, लेखा विभागाचे वरिष्ठ लिपीक सचिन मेहरा, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, गंगुबाई वानखेडे, मंगला खांडेभराड, बाबासाहेब वानखेडे, मंजु घायाळ, वंदना खांडेभराड, पंडीतराव भुतेकर, दिपक वैद्य, पोलिस निरीक्षक श्री माने, यांच्यासह बसपा, रिपाइं, रिपाइं, अ.भा. समता परिषद, महात्मा फुले विचार मंच, माळी महासंघ या संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी अर्जुनराव खोतकर यांनी महात्मा फुले यांचे विचार मनात घेवून कार्य करावे, सावित्रीबाई फुले यांचा पुणाकृती पुतळा जालना शहरात मनपाने जागेची पाहणी करून, पुतळा उभारावा, या पुतळ्यास आमदार फंडातून निधी दिला जाईल, असे सांगितले. आयुक्त संतोष खांडेकर यांनी संविधानाची शपथ घेवून, यांच्या विचाराने कार्य करावे, व त्यांचे स्वप्न पुर्ण करावे, असे ते म्हणाले. यावेळी भास्कर अंबेकर यांनी सावित्रीबाई फुले पुतळा शहरात बसविण्यात यावा, व त्यांच्या विचारावर सर्व समाजाने कार्य करावे असे आवाहन केले. आभार आयोजक बाबासाहेब वानखेडे यांनी मानले. यावेळी महानगरपालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. आज रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ जयंती ११ एप्रिल २०२५ रोजी जालना शहर मनपा परिसरात लड्डू वाटून उत्साहात साजरी करण्यात आली.

# स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई फर्निचरचे दुकान फोडणारा चोर पकडला

**जालना । प्रतिनिधी**

**माऊली फर्निचर व ईलेक्ट्रानिक नावाचे दुकान मालक बंद करुन घरी निघुन गेले असता मध्यरात्री सुमारास अनोळखी चोरट्यांनी दुकानाच्या शेडचे मागील बाजुचे पत्र्याचे स्क्रू काढुन पत्रे उचकाटुन दुकानात प्रवेश करुन फर्निचर व इलेक्ट्रानिक साहित्य असा मुद्येमाल चोरुन नेला आहे. त्यावरुन पोलीस ठाणे मौजपुरी येथे कलम ३३४ (१),३०५ भा. न्या. सं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.**



सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने गुन्हा उघड करुन आरोपी निष्पन्न करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक यांनी तसेच मा. पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांच्या सुचने प्रमाणे व मार्गदर्शनाखाली सदर गुन्हा उघडकिस करुन आरोपी अटक करणेबाबत सुचना दिल्या त्यानुसार वरीष्ठांनी दिलेल्या सुचना प्रमाणे गुन्हयाचे घटनास्थळी तात्काळ फिंगर प्रिन्ट व डॉग युनिट यांना पाचारण केले तसेच फिर्यादी यांच्या फर्निचर दुकानातील सी.सी.टि.व्ही फुटेज हस्तगत करुन पाहणी करुन गुन्हयात मुद्देमाल चोरुन घेऊन जाण्याकरीता वापरलेली बोलेरो पिकअप व आरोपी बाबत गुप्त बातमीदारामार्फत माहिती घेऊन मौजपुरी चे सपोनि मिथुन घुगे व स्थानिक गुन्हे शाखा येथील श्री. राजेंद्र वाघ यांच्या पथकासह गुन्हयाचे तांत्रिक विश्लेषण करुन आरोपी नामे दिलीप दगडुबा झिने रा.लोणगाव ता. भोकरदन जि. जालना यास ताब्यात घेतले व त्यास विश्वासात घेऊन विचारपुस करता त्याचे सदर गुन्हा हा आरोपी विनोद काळे, बळीराम फुके दोघे रा.लोणगाव ता. भोकरदन यांच्या मदतीने केल्याचे कबुल केले असुन गुन्हयात चोरी केलेला मुद्येमाला बाबत विचारपुस करता सदर आरोपीने गुन्हयातील चोरी केलेल्या मुद्येमाला पैकि एल.ई.डी. टि.व्ही ३२ इंच, सुर्या कंपनीच्या गॅस शेगड्या, मिक्सर व गुन्हयात वापरलेला बोलेरो पिकअप असा एकुण ०७ लाख ७५ हजार रुपयाचा सविस्तर पंचनामा करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच उर्वरीत मुद्येमाल हा त्याचे ईतर फरार साथीदार यांच्याकडे असल्याचे सांगत असुन नमुद गुन्हयात इंतर फरार आरोपीतांचा शोध घेणे चालु असुन सदर गुन्हयातील पूर्ण गेला माल हस्तगत करुन व आरोपी अटक करुन गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे. सदरची कामगीरी अजयकुमार बंन्सल, पोलीस अधीक्षक, जालना, आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक, श्री. दादाहरी चौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग परतुर तसेच श्री. पंकज जाधव, पो.नि. स्थागुशा, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची कामगीरी मिथुन घुगे, सहा. पोलीस निरीक्षक, सपोनि योगेश उबाळे, स्थागुशा, जालना, सपोनि डिगांबर कठाळे, फिंगर प्रिन्ट शाखा, जालना, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, प्रभाकर वाघ, लक्ष्मीकांत आडेप, ईशाद पटेल, कैलास खार्डे, रमेश काळे, सागर बावीस्कर, स्थागुशा, जालना, गणेश वाघ, राजेंद्र राव, रवि खलसे फिंगर प्रिंन्ट शाखा, जालना व ज्ञानोबा बिरादार, संजय राऊत, दादासाहेब हरणे, प्रदिप पाचरणे, अविनाश मांटे यांनी केली आहे.

# क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती वडवणी शहरात उत्साहात साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरांमध्ये क्रांतीसुर्य शिक्षणाचे अग्रदूत महात्मा फुले यांची १९८ वी जयंती आज वडवणी शहरांमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. वडवणी शहरातील बहुजन समाजाच्या वतीने आज क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीच्या आयोजन महात्मा फुले चौक वडवणी या ठिकाणी करण्यात आले होते या चौकामध्ये वडवणीचे माजी नगराध्यक्ष राजेभाऊ अण्णा मुंडे नगराध्यक्ष शेषेराव बापू जगताप बिटअंमलदार राऊत साहेब यांच्या शुभहस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आला. क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी देशातील पहिली मुलींची शाळा त्याचबरोबर अस्पृश्य समाजासाठी शाळा आणि आपल्या स्वतःच्या घरामधील हौद पाणी पिण्यासाठी खुला केला त्याचबरोबर क्रांतीसुर्य महात्मा फुले यांनी समाजसुधारकांच्या माध्यमातून केशव पण विधवा पुनर्विवाह त्याचबरोबर जरठकुमारी विवाह अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमधील महात्मा फुले यांचे काम आहे त्याचबरोबर महात्मा फुले यांनी क्रांतिजोती सावित्रीमाई फुले यांना शिकवून समाजसेवेचे धडे देऊन त्यांनी खूप मोठं काम समाजसाठी उभे केले आहे .

शेतकऱ्याचा आसूड तृतीय रत्न त्याचबरोबर अनेक वर्तमानपत्र सुरू केली होती महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये सुरू केले होते .त्याचबरोबर पुण्याचा महापौर सुद्धा झाले होते महात्मा फुले भूषविले होते छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्टेशन आहे मुंबईचा या ठिकाणचा जो काम आहे त्या कामाला महात्मा फुले यांच्या पुना कमर्शियल कंपनीचा मोठा त्याचबरोबर पुण्याचा पाण्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी खडकवासला धरणाची निर्मिती केली आज ही सुस्थितीत आहे.त्याचबरोबर त्यांनी पुण्याचा बोगदा असेल त्याबरोबर दगडी पूल पुण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटविण्यासाठी धरण बांधले असेल या माध्यमातून त्यांनी अष्टपैलू नेतृत्व यातून महात्मा ज्योतिबा फुले यांचे दिसून येत त्याचबरोबर महात्मा फुले यांच्या जीवनामध्ये सगळ्यात महत्त्वाचं काम म्हणजे ज्या ब्राह्मण समाजातील महिला



आत्महत्या करायला चालली होती आणि ती आत्महत्या करत असताना उडी नदीमध्ये मारत असताना महात्मा फुले त्या महिलेला विचारला तू असं काय करत आहेस त्या महिला पोटशी होती आणि त्या महिलेला त्यांनी घरी नेलं आणि तिचं बाळंतपण केलं त्याचबरोबर तिला जो मुलगा होता त्या मुलाला स्वतःचा मुलाप्रमाणे प्रेम दिल आणि महात्मा फुले यांनी त्या मुलाचे नाव यशवंत नाव ठेवलं पुढे महात्मा फुले यांचा हाच यशवंत नावाचा मुलगा डॉक्टर झाला त्यांनी सुद्धा समाजसेवा केली पुढे महात्मा फुले यांना अर्धांगी वायू झाल्यामुळे महात्मा फुलेंनी डाव्या हाताने सत्यशोधक ग्रंथ लिहिला त्याच्या निधनानंतर सुधा देशातील मनुवादी लोकांनी त्यांना स्वतःचा पुत्र नसल्यामुळे यशवंत नावाचा दत्तक पुत्राला अंत्यविधी करण्यापासून रोखले त्यावेळी सावित्रीमाई यांनी महात्मा फुले यांनी पाणी पाजले व अग्नीडाग दिला देशातील ही पहिली घटना होती ऐतिहासिक होती . पुढे क्रांती जोती सावित्रीमाई फुले यांनी ज्यावेळेस पुण्यामध्ये प्लेगची सात आली होती ती प्लेगची सात आटोक्यात येत नव्हती ती आटोक्यात आणण्यासाठी डॉक्टर यशवंत महात्मा फुले यांचे मानस सुपुत्र सुपुत्र यांनी ती साथ आटोक्यात आणण्यासाठी मोफत इलाज सुरू केला आणि याच वेळेस क्रांतिजोती सावित्रीमाई फुले ज्यावेळेस एका मुलीला घेऊन त्या डॉक्टर यशवंत कडे आल्या होत्या त्यावेळी डॉक्टर यशवंत यांच्याकडे यांचे कडे एकच लस शिल्लक होती आणि पाहून यशवंत डॉक्टर म्हणाले आई ही एकच लस त्या मुलीला देऊ का तुला देऊ अशा प्रकारचे म्हणले त्यावेळेस महात्मा फुले यांच्या पत्नी आहे जी महात्मा फुले यांच्या पासून तिने समाजसेवेचे धडे घेतलेत त्यांनी सांगितलं ही लस या मुलीला गरजेची आहे .आणि अशाच वेळेस क्रांतिजोती सावित्रीमाई फुले यांचे समाजसेवा करताना निधन झालं अशा प्रकारची परिस्थिती मध्ये भारतामधील असे दांपत्य आहे की ज्यांनी आपल्या समाजासाठी स्वतःचा आयुष्याकडे स्वतःच्या जीवाची परवाना करता बाजी लावली अशा महापुरुषांना या ठिकाणी अभिवादन करण्यात आलं त्रिवार अभिवादन करण्यात आलं यावेळी या कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्ष राजेभाऊ अण्णा मुंडे नगराध्यक्ष शेषेराव जगताप ओबीसी नेते प्रा. वैजनाथ शिंदे बी .एम. पवार सभापती बाबासाहेब वाघमारे,आप्पासाहेब पवार,बाबासाहेब साळवे , ॲड.भास्कर उजगरे भावसार समाजाचे महेश सदरे धनगर समाजाचे शहाजी लोकरे डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे ,संपादक सतीश वाघमारे,मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष सतीश सोनवणे, पत्रकार भैय्यासाहेब तांगडे,सतीश मुजमुले ,कृष्णा शिंदे ,बालाजी शिंदे ,नारायण शिंदे ,रमेश शिंदे ,कल्याण शिंदे ,लक्ष्मीकांत शिंदे, विशाल शिंदे ,प्राध्यापक तेजस शिंदे, वैभव शिंदे ,सुरेश भोरे,दीपक उजगरे ,अण्णासाहेब मस्के, माऊली कटारे, पडूळे टेलर ,गणेश शिंदे, पपू शिंदे, महात्मा फुले यांच्या वेशात प्रगती शिंदे ,यांच्यासह सर्व क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

# महात्मा ज्योतीबा फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**जालना। प्रतिनिधी**

**जालना शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील जि.प. प्रशाला (मुलांची) येथे महात्मा ज्योतीबा फुले सार्वजनिक उत्सव समिती २०२५ च्या वतीने महात्मा ज्योतीबा फुले जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.**

११ एप्रिल २०२५ रोजी जि.प. शाळेच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक जालना शहर मनपाचे आयुक्त संतोष खांडेकर हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश कुंडलकर, लक्ष्मणराव हरकळ, नंदकुमार जांगडे, महेंद्र रत्नपारखे, कार्यक्रमाचे आयोजक तथा महात्मा ज्योतीबा फुले सार्वजनिक उत्सव समितीचे अमरदिप शिंदे यांच्यासह मिर्झा अन्वर बेग, नगरसेवक महेश निकम, विजय पवार, सोमेश.

# जखमी विद्यार्थ्याच्या कृत्रिम डोळ्याच्या उपचारासाठी मैत्र मांदियाळी ग्रुपकडून २० हजार रुपयांची मदत

## आनंदग्रामचे दत्ताभाऊ बारगजे यांच्या पुढाकाराने मिळाली जीवनदायी मदत..!

**बीड। प्रतिनिधी**

**जिलेटिन स्फोटात गंभीर जखमी झालेल्या १४ वर्षीय आनंद हालकडे या विद्यार्थ्याच्या कृत्रिम डोळयाच्या उपचारासाठी मैत्र मांदियाळी या जालना येथील सामाजिक संस्थेकडून २०,००० रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. या मदतीसाठी आनंदग्रामचे समाजसेवक दत्ता भाऊ बारगजे यांनी विशेष पुढाकार घेतला होता.**

आनंद हालकटे या विद्यार्थ्याचा ९ जुलै २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात जिलेटिन स्फोटात डावा डोळा गमावला आणि अंगठाही तुटला. अतिशय हलाखीच्या परिस्थितीत त्याचे पालनपोषण होत असून, वडील नसल्याने आई मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे. घटनेनंतर दत्ता भाऊ बारगजे यांनी तातडीने डॉ. तात्याराव लहाने व डॉ. विठ्ठल लहाने यांच्या भेटी घेऊन त्या बाळाची सर्व परिस्थिती सांगितली पत्र निवेदन दिले, त्यानुसार प्रख्यात प्लास्टिक सर्जन डॉ विठ्ठल लहाने सर यांनी बोटा हाताची सर्जरी व जगद्विख्यात नेत्र तज्ञ डॉ तात्याराव लहाने यांनी त्यांच्या डोळ्याची निशुल्क सर्जरी केली मात्र पुढील टप्प्यात कृत्रिम डोळा बसवण्याचा खर्च भरणे कुटुंबासाठी शक्य नव्हते. ही बाब लक्षात घेता दत्ता भाऊ बारगजे यांनी जालना येथील मैत्र मांदियाळी ग्रुपशी संपर्क साधून सर्व परिस्थिती सांगितली व कृत्रिम बुबूळ बसवण्यासाठी मदतीचे आवाहन केले. सामाजिक कार्यात सतत सक्रिय असलेल्या आणि हजारो उपेक्षित गरजू विद्यार्थ्यांना उजेडाच्या दिशेने घेऊन जाणार्या इंजि. अजय किंगरे व मैत्र मांदियाळी ग्रुपच्या माध्यमातून तत्काळ २०,००० रुपयांची मदत जाहीर करत माणुसकीचा आदर्श निर्माण केला नव्हे आनंद ला नवि दृष्टी दिली. मैत्र मांदियाळी हा ग्रुप दरवर्षी दिवाळी फराळ वाटप, गरजूंसाठी मदत आणि समाजातील सुखदुःखात सक्रिय सहभागी होतोय हे विशेष .आनंदच्या कुटुंबीयांनी या सहकार्याबद्दल मैत्र मांदियाळी आणि दत्ता भाऊ बारगजे यांचे आभार मानले. अशा मदतीमुळे गरजूंना नवसंजीवनी मिळते आणि समाजात माणुसकीचे नाते अधिक घट्ट होते.

## पान १ वरून...

### शेतकरी बेहाल तर

टक्के रक्कम शेतकऱ्यांना भरावी लागते. याचा बोजाही शेतकऱ्यांवर न ठेवता त्यांना केवळ एक रुपया भरून विमा पोर्टलवर पीकविम्याची नोंदणी करता येते. मात्र, या योजनेत अनेक घोटाळे झाल्याचे आरोप झाले. महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी ही योजना गुंडाळण्याचे संकेतही दिले होते. पीकविमा योजनेत खरीप हंगामातील १४ पिकांना ही योजना लागू आहे. त्यात भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, तूर, मूग, उडीद, भुईमूग, सोयाबीन, तीळ, कारळे, कापूस व कांद्याचा समावेश आहे. रब्बी हंगामातील ६ पिके या योजनेत येतात. त्यात उन्हाळी भात, गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, उन्हाळी भुईमूग, रब्बी कांद्याचा समावेश आहे. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक असून सर्व पिकांसाठी ७० टक्के जोखीमस्तर ठेवण्यात आला आहे.

--------

### लोकांचे मूलभूत

नोडल एजन्सी असलेल्या एनएएनच्या काही कार्यालयांवर छापे टाकले होते. या छापेमारीत ३.६४ कोटी रुपयांची बेहिशेबी रोकड जप्त केली होती. याप्रकरणी ईडीने २०१९ मध्ये मनी लाँडरिंग कायद्याअंतर्गत तक्रार दाखल केली होती. या घोटाळ्यात अनेक नोकरशहा आणि इतर मोठी नावे देखील आरोपी आहेत आणि अनेकांना अटक देखील करण्यात आली आहे. ईडीने हे प्रकरण छत्तीसगडबाहेर हस्तांतरित करण्याची आणि काही हाय-प्रोफाइल आरोपींना मिळालेला अटकपूर्व जामीन रद्द करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात केली होती.

----------

### प्रशांत कोरटकरच्या सुटकेसाठी

काळ्या फिल्मिंग असलेल्या गाडीचा वापर झाल्याने कोल्हापूरकर चिडले. सामान्य नागरिकांच्या गाड्यांवर फिल्मिंगसाठी दंड ठोठावला जातो, पण कोरटकरसाठी विशेष व्यवस्था केल्याचा आरोप होत आहे. कोरटकरला कोल्हापूरात न्यायालयात हजर करताना आणि सुटकेसाठी पोलिसांनी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली होती. पण याचवेळी माध्यमांच्या गाड्या अडवून आणि काळ्या फिल्मिंगच्या गाडीला परवानगी देऊन पोलिसांनी कायद्याची पायमल्ली केल्याचा आरोप होत आहे. दिलीप देसाई यांनी याबाबत तक्रार दाखल करत म्हटले, ''काळ्या काचा असलेली गाडी कळंबा कारागृहात कशी आली? सामान्य नागरिकांना तिथे वाहन नेण्यास मनाई आहे, मग कोरटकरसाठी ही विशेष व्यवस्था कोणी केली? मोटर वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या या गाडीवर कारवाई का झाली नाही?'' देसाई यांनी कोल्हापूर पोलीस अधीक्षक आणि प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना पत्र लिहून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. प्रशांत कोरटकरच्या सुटकेसाठी पोलिसांनी केलेल्या या 'व्हीआयपी' व्यवस्थेमुळे कोल्हापूरकरांमध्ये नाराजी पसरली आहे. छत्रपतींचा अवमान करणाऱ्या व्यक्तीला अशी विशेष व्यवस्था मिळणे नागरिकांना रुचलेले नाही. या प्रकरणात पोलिसांवर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------

### गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजने

मंत्री, प्रधान सचिव यांच्याकडे या कामासाठी पाठपुरावा करत असल्यामुळे अखेर या योजनेअंतर्गत गाळ काढण्यास परवानगी मिळाली असून या कामासाठी २ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून नाम फाउंडेशन आणि टाटा उद्योग समूह या संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कामे राजाभाऊ शेळके आणि केशव आघाव यांचीही मोठे सहकार्य लाभले आहे. असे सांगत ते पुढे म्हणाले की, तलावातील गाळ उपसा करून शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर्स मध्ये भरून देण्यात येणार आहे. दिनांक ११ एप्रिल रोजी जलसंधारण विभागाने आदेश काढून मध्यम प्रकल्पातील गाळ काढण्याच्या कामासाठी अशासकीय संस्था म्हणून प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशन पुणे आणि टाटा उद्योग समूह या संस्थांची नियुक्ती या गाळ काढणे कामासाठी करण्यात आलेली आहे.आष्टी तालुक्यातील मेहेकरी मध्यम प्रकल्पातील १ लाख ११ हजार तीनशे घनमीटर गाळ उपसा करण्यास परवानगी मिळाली असून कडा मध्यम प्रकल्पातील ७२ हजार ८०० घनमीटर कडी मध्यम प्रकल्पातील ५० हजार २५० घनमीटर आणि रोटी मध्यम प्रकल्पातील १ लाख ८ हजार तीनशे घनमीटर एवढा गाळ उपसण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी आपापल्या जमिनीवर हा गाळ टाकल्यास तलावातील गाळामुळे जमीन सुपीक होणार असून रासायनिक खताचा खर्च देखील कमी होत असतो त्यामुळे जमिनीचा पोत देखील वाढतो आणि तलावातील गाळ उपसल्यामुळे तलावातील पाणीसाठ्यामध्ये वाढ होणार असून परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीमध्ये देखील वाढ होणार आहे. त्यामुळे या गाळ मुक्त धरण आणि गायुक्त शेत या योजनेचा शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा १३ एप्रिल किंवा १४ एप्रिल रोजी रोटी मध्यम प्रकल्प येथील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात येणार आहे शेतकऱ्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन देखील आ.सुरेश धस यांनी शेवटी केले आहे.

-------

### अण्णाद्रमुक-भाजप

मध्ये अण्णा द्रमुकच्या नेतृत्वाखाली लढवण्यात येणार आहेत. पंतप्रधान मोदी आणि तामिळनाडूच्या माजी मुख्यमंत्री जयललिता यांनी अनेक वर्षे राष्ट्रीय राजकारणात एकत्र काम केले आहे. आम्हाला काहीही संभ्रम निर्माण करायचा नाही. आम्ही पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवणार आहोत. मला पूर्ण विश्वास आहे की येणाऱ्या निवडणुकीत एनडीए प्रचंड बहुमताने विजयी होईल आणि तामिळनाडूमध्ये एनडीएचे सरकार स्थापन होईल, असे शहा म्हणाले.

-------

### महिलांची पहिली शाळा थोरले प्रतापसिंह महाराज

उदयनराजेंवर निशाणा साधला. ते म्हणाले, ''फुलेवाड्यात येऊन उदयनराजे असे बोलत असतील तर ते चुकीचे आहे. खोटा इतिहास पसरवण्याचा प्रयत्न त्यांनी करू नये. अन्यथा 'कोण होतास तू, काय झालास तू' असे म्हणावे लागेल.''

---------

### माजलगावात दोन जुगार अड्यावर छापा

रा.माजलगांव यांच्या विरुध्द महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये माजलगाव शहर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कारवाई नवनित कॉवत,पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, अनिल चोरमले पोलीस उपअधीक्षक उपविभाग अंबाजोगाई,अति. पदभार माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक के.बी. माकणे,पोहवा/ माधव तोटेवाड, यांनी केली आहे.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. १२ एप्रिल २०२५



## अध्यक्षपदी अनंत मुंडे तर सचिवपदी पवन पवार



**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुका ग्रामीण पत्रकार संघांच्या अध्यक्षपदी अनंत मुंडे उपाध्यक्षपदी रमेश सुरवसे तर सचिव पदी पवन पवार यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

दि.१०एप्रिल रोजी वडीगोद्री येथे ग्रामीण भागातील पत्रकारांच्या बैठकीत नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे

यावेळी सदस्यांनी दिलीप पवार, दिलीप दखने,,रवींद्र घाडगे, रोहिदास पवार, सुरेश काळे , चक्रधर नाटकर ,पांडुरंग सोळुंके ,फकीर मोहम्मद बागवान,ॲड.राजेंद्र पवार, शैलेश मरकड ,अशोक गायकवाड , अशोक चांगले , सुदर्शन गावडे, किर्तीनंद गांगुर्डे, मुकेश डुचे , माऊली दाबोले, बंडू शिंगटे, रजनिस कनके , कैलास खरात मोहन रोटे आदी उपस्थित होते.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना आधुनिक भारताचे शिल्पकार मानले जाते - राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना आधुनिक भारताचे शिल्पकार मानले जाते असे मत अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते आज महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत त्यांना अभिवादन करतांना बोलत होते. यावेळी त्यांच्या सोबत मनोज लखेरा ,महादेव आदमाणे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले, सुनील वाघाळकर , भागवत मसने, अमोल लोमटे, धम्मा सरवदे, सुभाष पानकोळी, सुधाकर टेकाळे, गणेश मसने, दत्ता सरवदे, विजय रापतवार, अंकुश हेडे, शाकेर काझी, अकबर पठाण, गोविंद पोतंगले,रोहन कुरे, आकाश कऱ्हाड, खलील जाफरी, ताहेर भाई, अस्लम शेख,उज्जेन बनसोडे, मुन्ना पठाण, सुशील जोशी, शरद काळे, अमित परदेशी,गुड्डू जोगदंड, यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.**



क्रांतिसूर्य महात्मा फुले यांची १९६ वावी जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. अंबाजोगाई शहरातील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयातील महात्मा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी व शहर वासीयांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महात्मा फुले यांनी साक्षरतेचा मूलमंत्र जगाला दिला . वर्णभेद , जातीभेदाच्या अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्याचे काम महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले . अशा या थोर विभूतीची आज १९६ वी जयंती संपूर्ण देशात साजरी केल्या जात आहे. शिक्षणाचा हक्क व अधिकाराची लढाई लढतांना त्यांना खंबीर अशी साथ सावित्रीबाई फुले यांनी दिली असेही मत राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केले. महात्मा फुले हे लहानपणापासूनच अभ्यासू व जिज्ञासू वृत्तीचे होते .ब्रिटिशांची राजवट उलथून टाकण्याचे विचार त्यांच्या मनात लहानपणापासूनच लोळत होते . त्यांनी लहुजी साळवे यांच्या कडून शारीरिक शिक्षनाचे धडे देखील घेतले होते असे विचार राजकिशोर मोदी यांनी प्रकट केले . चूल आणि मूल याच्या जोखडातून स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी आपले आयुष्य झिजविले. त्यामुळेच डॉ बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा फुले यांना आपले गुरू मानत असत. आज समाजात स्त्री ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ताठ मानेने फिरते आहे ते केवळ माता सावित्रीबाई आणि ज्योतीबा फुले यांच्या मुळेच अशी भावना राजकिशोर मोदी यांनी आज क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली अर्पण करताना व्यक्त केली . तळगळातून आलेल्या जोतीराव फुले यांच्यासारख्या विचारवंताला सामाजिक विषमतेचे भीषण स्वरूप जवळून पाहिला मिळाले. वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद यावर आधारित सर्व सामाजिक आर्थिक विषमतांचा नायनाट करून सर्वांना समान वागणूक मिळावी हा त्यांचा ध्यास होता. दलितांना शोषितांना व स्त्रियांना समता द्यायची तर परोपकार भावनेतून नव्हे तर त्यांचा तो हक्क आहे अशी भावना महात्मा फुले यांची होती. स्त्री असो वा पुरुष माणसाला माणसाचे हक्क मिळालेच पाहिजेत असा कायमस्वरूपी ध्यास ज्योतिबांचा होता असेही मत राजकिशोर मोदी यांनी अभिवादन प्रसंगी व्यक्त केले. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय त्याचबरोबर सांस्कृतिक उद्बोधनामुळेच क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना आधुनिक भारताचे शिल्पकार मानले जाते अशी स्पष्ट भावना राजकिशोर मोदी यांनी ज्योतिबा फुले यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करताना व्यक्त केली. शेवटी महात्मा फुले यांना सर्वोच्च अशा भारतरत्न या उपाधीने सन्मानित करण्यात यावे अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

## घरकुल लाभापासून एकही विवाहित जोडी वंचित राहू देऊ नका-राजेंद्र आमटे



**बीड । प्रतिनिधी**

**प्रधान मंत्री आवास योजना अंतर्गत टप्पा २ चा सर्व्हे सुरू करण्याचे आदेश सर्व पंचायत समितीच्या वतीने सर्व ग्रामसेवकांना देण्यात आले आहेत. परंतु अनेक गावामध्ये सर्व्हे करण्यास सुरुवात केली नाही ग्रामीण भागातील अनेक कुटुंब घरकुलाच्या लाभा पासून वंचित आहेत. अनेकाना आज हि घरकुलाचा लाभ मिळालेला नाही अनेक कुटुंब कुडाच्या घरात राहत आहेत.**

प्रत्येक गावातील नागरिकांनी आपल्या कुटुंबातील विवाहित जोडीचा प्रधान मंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत आपल्या पती - पत्नी आपला घरकुलाचा सर्व्हे करू घेण्यात यावा संपूर्ण जिल्हा मध्ये एक हि विवाहित जोडी घरकुलाच्या लाभा पासून वंचित राहू नये या करतात शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने डॉ ज्योतीताई मेटे व शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष प्रा जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड

### सर्व्हेत वंचित राहिल्यास अधिकाऱ्यावर कारवाई करा :- शिवसंग्राम

जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले या वेळी सर्व पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना सूचना करून एकही विवाहित जोडी वंचित राहू नये जर एखाद्या अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणा मुळे वंचित राहिल्यास अधिकाऱ्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणीडॉ ज्योती ताई मेटे व जिल्हाध्यक्ष प्रा.जाधव सर मार्गदर्शन खाली शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर कोकाटे, बीड तालुकाध्यक्ष पंडित माने, गोपीनाथ घुमरे पाटील,प्रसिद्धी प्रमुख पंडित शेडगे,ज्ञानेश्वर डोरले, शामसुदर आमटे, रमेश जगताप, यांच्यावतीने निवेदन देण्यात आले.

## मराठी पत्रकार परिषदेच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी अविनाश कदम यांची निवड

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम हे गेल्या पंधरा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात राजकीय,सामाजिक, शैक्षणिक,धार्मिक, शासकीय व प्रसिद्धी पासून कोसो दूर असलेल्या वंचित घटकाला न्याय देण्याचे काम करत आहेत व दैनिक लोकमत, मराठवाडा साथी या वृत्तपत्र आणि आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या माध्यमातून सामाजिक जोपासना करून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे अविनाश कदम यांच्या कामाची दखल मराठी पत्रकार परिषदेने घेतली असून पुन्हा बीड जिल्हा उपाध्यक्षपदी फेरनिवड मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे यांनी बीड येथे ८ एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृहात झालेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या बीड जिल्हा पदाधिकारी यांच्या बैठकीत सत्कार करून व नियुक्तीपत्र देऊन निवड केली आहे. अविनाश कदम यांच्या निवडीबद्दल युवा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष निसार शेख,सचिव जावेद पठाण,कार्याध्यक्ष अक्षय विधाते, कार्यवाहक



गहिनीनाथ पाचबैल,अतुल जवणे, संघटक समीर शेख, प्रेम पवळ, सहसचिव संतोष नागरगोजे,विधी सल्लागार ॲड किशोर निकाळजे,संपादक बबलू सय्यद, जेष्ठ पत्रकार बा म पवार, संतोष दाणी,राजेंद्र लाड, जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे, संतोष तांगडे, सोपान पगारे, मारूती संत्रे,आदिनाथ ठोंबरे, शिक्षक अनिल बेदरे,किरण शिनगिरे, विजय राजपुरे, महिला पत्रकार प्रिया पवळ, सुरेश मोरे, विपुल सदाफुले यांच्यासह बीड,आष्टी, पाटोदा, शिरूर, अंबाजोगाई, गेवराई, परळी, धारूर, वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधवांसह, राजकीय, सामाजिक, धार्मिक,मित्र परिवार व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## चंद्रकांत राजहंस यांची मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा उपाध्यक्षपदी फेरनिवड

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदेवाली येथील ज्येष्ठ व निष्पक्ष पत्रकार चंद्रकांत राजहंस यांची मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा उपाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे. परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ही निवड जाहीर केली. यावेळी त्यांचा विशेष सत्कार करण्यात येऊन नियुक्तीपत्र देण्यात आले.



चंद्रकांत राजहंस हे गेली तब्बल १८ वर्षे पत्रकारितेच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून, त्यांनी आपल्या बातम्यांमधून ग्रामीण भागातील समस्या, उपेक्षितांचे प्रश्न, सामाजिक अन्याय आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाला वाचा फोडण्याचे कार्य प्रामाणिकपणे केले आहे. देवगिरी तरुण भारत, दैनिक लोकप्रश्न, दैनिक सुराज्य आणि सध्या दैनिक सकाळ या प्रमुख दैनिकांमधून ते पत्रकारितेची सेवा अखंड बजावत आहेत.

ते केवळ वृत्तसंकलनापुरते मर्यादित न राहता, पत्रकार संघटना आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातूनही सातत्याने सक्रिय राहिले आहेत. शिरूर तालुका पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांचे प्रश्न, स्थानिक समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रभावी भूमिका बजावली आहे. कोणत्याही प्रसिद्धीपासून दूर राहून, निस्वार्थ वृत्तीने कार्य करणाऱ्या चंद्रकांत राजहंस यांनी ग्रामीण पत्रकारितेची एक वेगळी छाप निर्माण केली आहे.त्यांच्या या सामाजिक जाणिवा असलेल्या पत्रकारितेची आणि प्रामाणिक कामगिरीची दखल घेऊन मराठी पत्रकार परिषदेने त्यांची पुन्हा जिल्हा उपाध्यक्षपदी फेरनिवड केली आहे. त्यांच्या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या निवडीबद्दल त्यांच्यावर सर्वच स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तालुक्यातील पत्रकार बांधव, राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, मित्र परिवार, संत-महंत व नागरिकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## पान ६ वरुन...

### समाज मंदिरासाठी जागा

मागिल अनेक वर्षांपासून विविध राज्यकर्त्यांना समाज बांधवांनी मागणी केली.मात्र या मागणीकडे राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष करत समाज बांधवांचा निवडणुकीपुरता वापर केला गेला.आ.विजयसिंह पंडित हे आमदार होताच शहरातील गवळी समाजाच्या त्यांच्याकडून अशा पल्लवीत झाल्या आहेत.तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित यांना देखील पंधरा दिवसांपुर्वी समाज बांधवांनी मागणी करताच त्यांनी या मागणीसाठी सकारात्मक भुमिका घेतली आहे.शुक्रवार रोजी शहरातील गवळी समाज बांधवांनी आ.विजयसिंह पंडित यांची कृष्णाई येथे भेट घेतली.गेवराई शहरात गवळी समाज बांधवांसाठी समाजाच्या मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी,तसेच मंदिर बांधण्यासाठी निधी देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी आ.विजयसिंह पंडित यांनी गवळी समाज बांधवांच्या मागणीला उत्तर देताना सांगितले की,गेवराई शहरात गवळी समाजाच्या मंदिरासाठी लवकरच जागा उपलब्ध करुन देऊ, तसेच मंदिर बांधण्यासाठी निधी देण्यात येईल असे आश्वासन आ.पंडित यांनी यावेळी दिले.

यावेळी नारायण अवधुत, भागवत परळकर,सुंदरआप्पा दंहिडे,दत्ता हाद्गुले,बाबा अवधुत, रामेश्वर अवधुत,शंकर हाद्गुले, बबन परळकर, सोमनाथ नामदेव,शंकर हाद्गुले,मनोज हाद्गुले आदिंसह समाज बांधव उपस्थित होते.दरम्यान माजी आमदार अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांनी आता याबाबत लक्ष घातल्याने या मागणीला लवकरच यश येणार असल्याने समाज बांधवांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

### राक्षसभुवन येथे भक्ती आणि

करण्यात आली. हा पुष्पवृष्टीचा कार्यक्रम म्हणजे श्री.क्षेत्र नारायणगडाच्या भक्तांच्या मनातील भक्ती आणि मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या मराठा समाजाची जनशक्ती असा दुहेरी संगम आल्यामुळे राक्षसभुवन येथे भक्ती आणि शक्तीचा संगम पाहायला मिळाला आहे.

या पुष्पवृष्टीच्या कार्यक्रमासाठी महंत शिवाजी महाराज यांच्यासह उत्तराधिकारी संभाजी महाराज,महंत रंगनाथ महाराज सुरळेगावकर, महंत भानुदास महाराज शास्त्री, महंत श्रीरंग महाराज डोंगरे, महंत सत्यवान महाराज लाटे, नारायण महाराज ढिसले,सिद्धेश्वर महाराज गाडे, गोरक्ष महाराज भिल्लारे आदी संत-महंतासह श्री.क्षेत्र नारायण गडाचे विश्वस्त सचिव ॲड. महादेव तुपे, सदस्य दिलीप गोरे, बळीराम गवते, गोवर्धन काशीद, जाधव साहेब, जे.पी शेळके आदी विश्वस्तसह प्रा.सुशीलाताई मोराळे, नितीन धांडे, गंगाधर कळकुटे,किशोर पिंगळे, रविराज गवते, हनुमान मुळीक, परमेश्वर तळेकर, धनंजय जगताप, संदीप लवांडे, गणेश नलावडे, विकास जगताप, गोरख कनूजे, महेश दाभाडे, आदिनाथ गवळी,आदींसह धार्मिक,सामाजिक , राजकीय क्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची लक्षणीय उपस्थिती होती.

### स्वामी रामानंद तीर्थ

कौशल्याने देशाचा विकास करावा पुढील काळात अनेक संधी आहेत त्याचा उपयोग करून घ्यावा असेही ते म्हणाले. विद्यार्थ्यांनी सजग राहावे व मेहनत करून यशाला गवसणी घालावी असे मत अध्यक्षीय समारोपात चौसाळकर यांनी व्यक्त केले. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्देशानुसार झालेल्या या कार्यक्रमात पदवी प्रमाणपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. एम.ए.राज्यशास्त्र विषयात विद्यापीठात सर्वप्रथम आलेल्या राहुल हजारे तर इंग्रजी विषयात विद्यापीठात बी.ए.च्या परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या व सुवर्णपदक प्राप्त केलेल्या कु.स्नेहल पाचनकर हिला सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.थारकर यांनी केले.संचालन नाट्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी यांनी तर आभार प्रा.डॉ.रमेश सोनवळकर यांनी मानले. याप्रसंगी रमेश सोनटक्के,गंगाधर अकलोड,पदव्युत्तर विभागाच्या संचालिका डॉ.शैलजा बरुरे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

# दिनकर जोशी यांनी समाज शिक्षकाची भूमिका निभावली - फ.मु.शिंदे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शिक्षक, कवी व पत्रकार अशा विविध अंगांनी काम करत दिनकर जोशी यांनी समाज शिक्षकाची भूमिका योग्य पणे निभावली. असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी फ.मु.शिंदे यांनी केले.

येथील योगेश्वरी नूतन विद्यालयातील शिक्षक दिनकर वासुदेवराव जोशी हे आपल्या २९ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांच्या सेवा गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कवी फ.मु.शिंदे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, सौ.संध्या दिनकर जोशी, संयोजन समितीचे प्रसाद चिक्षे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना फ.मु.शिंदे म्हणाले की, सामान्य कुटूंबातील विद्यार्थ्यांच्या जीवनाला प्रकाश मान करण्याचे काम दिनकर जोशी यांनी केले. आत्मियता व समर्पणाच्या भावनेतून त्यांनी शिक्षण क्षेत्रात प्रामाणिक पणे व निष्ठेने काम केले. म्हणूनच एका शिक्षकाचा गौरव समाजाकडून होतो. ही कृतज्ञतेची भावना फार मोठी आहे. ती नैतिकता आपल्या कार्यातून दिनकर जोशी यांनी जोपासली आहे. समाजामध्ये एक व्यक्ती, साहित्य, कला, पत्रकारीता



व शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून गावचा लोकशिक्षक बनतो. ही भूमिका त्यांनी केलेल्या कर्तृत्वाचा गौरव आहे. असे सांगुन आपल्या आई या कवितेने त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला. यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना दिनकर जोशी म्हणाले की, महाराष्ट्रात वैभव संपन्न असणार्या अंबाजोगाई शहराने मला आपलस केलं. त्यामुळे या गावचे ऋण फेडता येणार नाही. माझे विद्यार्थी हेच माझे वैभव असल्याचे जोशी यांनी सांगितले.

अंबाजोगाई सारख्या शहरात येवून समाज घडविण्याचे काम दिनकर जोशी यांच्या माध्यमातून झाले आहे. शिस्तबद्ध शिक्षण ही शिक्षणाची परंपरा जोशी यांनी जोपासल्याचे नंदकिशोर मुंदडा यांनी आपल्या भाषणातून सांगितले. यावेळी बोलताना राजकिशोर मोदी म्हणाले की, अंबाजोगाई शहराची सांस्कृतिक व साहित्यीक चळवळ गतिमान करण्यासाठी दिनकर जोशी यांचे मोठे योगदान आहे. एक व्यक्ती म्हणून त्यांनी शहराच्या वातावरणाला दिलेली दिशा प्रेरणादायी असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. यावेळी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते दिनकर जोशी यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देवून सपत्नीक गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रसाद चिक्षे यांनी केले. संचलन मंजुषा खडके यांनी तर उपस्थितांचे आभार सदानंद वालेकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शंकर कराड, राजेसाहेब किर्दंत, रत्नाकर निकम, शंकर वरवडे यांनी परिश्रम घेतले.

**२९ माजी विद्यार्थ्यांचा सत्कार-:**

दिनकर जोशी यांनी २९ वर्षे विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे मौलिक कार्य केले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने त्यांनी २९ वर्षात घडविलेल्या २९ माजी विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# राधाकृष्णनगरीमध्ये हनुमान जन्मोत्सव

## सुरेशानंद कोळेकर महाराज यांचे शनिवारी काल्याचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील पांगरी रोड भागातील राधाकृष्ण नगरीमध्ये हनुमानजी जन्मोत्सव निमीत्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता शनिवार दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी हनुमान जन्मोत्सव सकाळी सूर्योदयाच्या वेळी होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.**

अखंड हरिनाम सप्ताहात दि. ०६ एप्रिल पासून दररोज सायंकाळी ६.०० हरिपाठ तर ७.३० ते ९.३० या वेळात मान्यवर कीर्तनकारांची



कीर्तनसेवा संपन्न झाली. शनिवारी सकाळी ११.३० दुपारी १.३० दरम्यान ह.भ.प. सुरेशानंद महाराज कोळेकर, शृंगऋषी संस्थान, शिंगारवाडी यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. पांगरीरोड भागातील राधाकृष्ण नगरी, बीड येथे आयोजीत या सप्ताहाच्या कार्यक्रमात गायनाचार्य ह.भ.प. बाबुराव मुंडे, मनोज महाराज बोटे, गणेश महाराज पिंपळे, दत्तात्रय महाराज बहिर, गणेश महाराज ढोबळे, शंभू महाराज धांडे, संदेश महाराज येडे, विणेकरी वाल्मीक महाराज चाटे, मृदंगाचार्य चंद्रकांत महाराज शेळके आदींची उपस्थिती आहे. काल्याच्या कीर्तनास व महाप्रसादास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समिती व राधाकृष्णनगरी परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नेकनूरच्या शासकीय अध्यापक विद्यालयातील सूर्यकांत पट्टेवाड यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**नेकनूर । प्रतिनिधी**

मांजरसुंबा येथे हॉटेल कन्हैयाच्या सभागृहात नेकनूर शासकीय अध्यापक विद्यालय नेकनुर येथून सेवा निवृत्त झालेले अधिव्याख्याता श्री. सूर्यकांत पट्टेवाड यांचा सेवा गौरव सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. यावेळी शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते त्यांचा सहपत्निक शाल, श्रीफळ, पुष्पहार व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. श्री. संदीप धोंडगे सर, प्रमुख अतिथी म्हणून श्री नंदकुमार गादेवार, श्री दत्तात्रय लांडगे, संजय आंबेकर, प्रा. अंकुश नाडे सर, राजकुमार मगर सर रा. शि. संघ बीड जिल्ह्याचे अध्यक्ष श्री रवींद्र खोड सर, नवनाथ म्हात्रे सर, मुख्याध्यापक पाखरे सर, श्री नागेश पाटील सर, वसंतराव घोगरे सर, प्रमोद रोडगे सर, पत्रकार तथा ग्रामपंचायत सदस्य अशोक शिंदे,



पत्रकार तुळजिराम शिंदे सर, पत्रकार अमजद पठाण, महारुद्र वाणी सर, अविनाश भोसले, शिवाजी वनारसे, काळे सर इत्यादी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच पट्टेवाड सरांचे माजी विद्यार्थी व परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

सूर्यकांत पट्टेवाड यांनी एकूण ३६ वर्षे शैक्षणिक सेवेत कार्य केले. त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवले. त्यांची शिकवण्याची पद्धत, विद्यार्थ्यांवरील प्रेम आणि शिस्तीचे भान यामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये विशेष लोकप्रिय होते.

cmyk

# वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने पूर्व विदर्भाला झोडपलं!

## बागायतदार शेतकरी आर्थिक संकटात, तोंडचा घास हिरावला

नागपूर : ऐन उन्हाळ्यात नागपूरसह पूर्व विदर्भातील अनेक भागात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावत एकच दाणादाण उडवली आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून रब्बी पीक मातीमोल झाले आहे. मागील दोन दिवसात भंडारा जिल्ह्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं जोरदार हजेरी लावली. काल (११ एप्रिल) सायंकाळच्या सुमारास काही भागात पावसानं अक्षरशः थैमान घातलं. अर्धा तास पडलेल्या या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसात बागायती शेतकरी संकटात सापडले आहेत.

मागील काही दिवसांपासून टोमॅटोला दर मिळत नसल्याने शेतकरी हतबल झालेले होते. आता लग्न समारंभाचा काळ सुरू झाल्यानं टोमॅटोला चांगले दर मिळायला सुरुवात झाली असतानाचं अवकाळी पावसानं आता शेतातील टोमॅटो पावसानं



खराब झालेत. त्यामुळं शेतकऱ्यांवर पुन्हा आर्थिक संकट ओढवलय. वादळी पावसात आंबा ही गळून पडल्यानं आंबा उत्पादकांवर संकट ओढवलेलं आहे. लग्न समारंभासाठी अनेक ठिकाणी उभारण्यात आलेले पेंडॉल कालच्या वादळी वाऱ्यात उडाले तर, काही ठिकाणी फाटले असल्याची दिसून आले आहे. वादळी वाऱ्यानं सौर ऊर्जेचे पॅनल उडाले असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

बुधवार आणि गुरुवारला भंडारा जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. या वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणचे वृक्ष कोसळल्याने विद्युत तारा तुटल्या.

मोहाडी तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात तर काही नागरिकांनी त्यांच्या घरावर सौर ऊर्जेचे शेड उभारून त्यावर सौर पॅनल लावले होते. प्रचंड वाऱ्याच्या वेगाने हे सौर पॅनल तुटले आणि दूरवर जाऊन पडल्याने शेतकऱ्यांचं मोठं आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवानं सोलर पॅनल उडून दूरवर पडत असताना कुठलीही जीवितहानी झाली नाही

## बनास डेअरीला पंतप्रधान मोदींकडून १०६ कोटी रुपयांचे बोनस

नवी दिल्ली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बनास डेअरीसाठी १०६ कोटी रुपयांचा बोनस जाहीर केला आहे. तसेच पशुपालकांना त्यांच्या कष्टाचे फळ मिळाल्याचे मोदी म्हणाले. मोदींनी काशीमध्ये ३ हजार ९०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे शुक्रवारी (ता.११) उद्‍घाटन केले. त्यावेळी ते बोलत होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, ‘‘बनास डेअरीने काशीतील हजारो कुटुंबांची आर्थिक परिस्थिती बदलली आहे. विशेषत: महिलांना सक्षम बनवलं आहे. पूर्वांचलमधील अनेक बहिणी आता लखपती दीदी झाल्या आहेत. पूर्वी जगण्याची चिंता होती, आता मात्र त्यांची पावलं समृद्धीकडे वळाली आहेत.‘‘ असा दावाही मोदींनी केला. पुढे मोदींनी देशातील दूध उत्पादनात मोठी वाढ झाल्याचा दावा केला. मोदी म्हणाले, ‘‘आज भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश आहे. मागील १० वर्षात ६५ टक्क्यांनी दूध उत्पादन वाढलं आहे. बनास डेअरी १ लाख शेतकऱ्यांकडून दूध संकलित करत आहे. तसेच गीर गायींचे वाटप करून पशुपालकांना सक्षम करत आहे.‘‘ असंही मोदी यांनी प्रतिपादन केले. यावेळी मोदींनी जीआय टॅग उत्पादनावर भाष्य केलं. वाराणसी भागातील ३० हून अधिक उत्पादनांना जीआय टॅग दिले आहेत. त्यामध्ये तबला, शहनाई, थंडाई, लाल मिरची, लाल पेडा आणि तिरंगा बर्फी यांचा समावेश आहेत. जीआय टॅग केवळ एक प्रमाणपत्र नाही. तर आपल्या मातीची ओळख पटवणारा पासपोर्ट असल्याचे मोदी म्हणाले. उत्तर प्रदेशातील उत्पादन जागतिक ब्रँड होत असून जीआयमुळे ऊंची गाठली आहे, असा दावा मोदींनी केला आहे. यावेळी काशीच्या विकासाशी संबंधित एक महत्त्वाचा प्रकल्प बनास डेअरी आहे. त्यामुळे शेतकरी आणि पशुपालकांना जोडण्याचं काम करण्यात आलं आहे, असं प्रतिपादन उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले.




## बहूपयोगी सेंद्रिय कीटकनाशक दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धती

सेंद्रिय कीटकनाशकाचा वापर करून किडींचे योग्य व्यवस्थापन करता येते. यामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होत नाही. सेंद्रिय शेतीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अर्क तयार केले जातात. त्यापैकीच एक म्हणजे दशपर्णी अर्क होय. दशपर्णी अर्क हा अत्यंत बहुगुणी आणि बहुउपयोगी अर्क आहे. नावाप्रमाणेच या अर्कात १० वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतीचा उपयोग केला जातो. वेगवेगळ्या उग्र वासाच्या वनस्पतीचा पाला यात वापरला जातो. दशपर्णी अर्क हे नैसर्गिक किटकनाशक असून, हे शेतकर्यांसाठी खूप फायदेशीर आहे व शेतीचा खर्च यामुळे नक्कीच कमी होवू शकतो.

दशपर्णी अर्कासाठी वनस्पतीचा वापर :कडुनिंब पाला ५ किलो, एरंडपाला २ किलो, गुळवेलपाला २ किलो, घाणेरीपाला २ किलो, पपईचा पाला २ किलो, सिताफळाचा पाला २ किलो, रूईचा पाला २ किलो, पांढरा धोतरा २ किलो, करंजपाला २ किलो, लाल कन्हेरपाला २ किलो, झेंडू पाने, निरगुडी, बेशरम, पेरू इत्यादी २ किलो.

इतर साहित्य :प्लास्टीक टाकी २०० लिटर, देशी गायीचे शेण ३ किलो, देशी गायीचे गोमूत्र ५ लिटर, हिरवी मिरची ठेचा २ किलो, लसुण ठेचा पाव किलो, वरीलपैकी कोणत्याही १० वनस्पतीचा पाला घ्यावा. एखाद दुसरी वनस्पती उपलब्ध नसल्यास इतर कोणत्याही उग्र वनस्पतीचा पाला चालू शकतो. शक्यतो देशी गायीचे शेण ताजे घ्यावे, सुकलेले



वापरू नये. गोमूत्र जितके जुने तेवढा त्याचा औषधी गुणधर्म जास्त असतो.

दशपर्णी अर्क तयार करण्याची पद्धत :यापैकी करंज, रूई, सिताफळाचा पाला, कडुनिंबाचा पाला, महत्त्वाचा बाकीचे सर्व उपलब्ध असतील त्यानुसार घेणे सर्व मिळून १० वनस्पती होणे गरजेचे आहे. वरील सर्व वनस्पती बारीक करून घेणे तसेच तिखट हिरवी मिरचीचा ठेचा, लसूण ठेचा, देशी गायीचे शेण व गोमूत्र हे सर्व मिश्रण २०० लिटर क्षमता असलेल्या पाण्याच्या ड्रममध्ये सडविण्यासाठी सावलीत ठेवून ते गोणपाटाने झाकून ठेवावे. दिवसातून कमीत कमी २ वेळा हे मिश्रण काठीने ढवळावे व पुन्हा गोणपाटाने झाकून ठेवून असे मिश्रण १ महिनाभर ठेवल्यानंतर त्याला उग्र वास येतो त्यानंतर हे मिश्रण सुती कापडाने गाळून घ्यावे. दशपर्णी अर्क तयार करताना तो सावलीच्या जागी करावा. दशपर्णी अर्क तयार झाल्यानंतर वस्त्रगाळ करण्यासाठी सुती कापडाचा वापर करावा.

दशपर्णी अर्काचा वापर :दशपर्णी अर्क तयार केल्यापासून ३ महिन्याच्या आत वापरता येते. मात्र अर्क बंद झाकणाच्या कॅनमध्ये व्यवस्थित ठेवलेला असावा. दशपर्णी हा तयार झालेला अर्क कीड नियंत्रणासाठी १६ लिटर पाण्यात २०० मिली दशपर्णी अर्क फवारणीसाठी वापर करावा. फवारणी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळी करावी.

दशपर्णी अर्काचे फायदे :दशपर्णी अर्काच्या फवारणीमुळे मित्र किडीचे संवर्धन होऊन नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रण होते. उग्र वासामुळे किडी पिकांमध्ये अंडी देण्यापासून परावृत्त होतात. रासायनिक किटकनाशकाचा वापर कमी झाल्याने पिकांवर किडनाशकांचे अंश राहत नाहीत. अर्क फवारणीमुळे लहान अळ्या, रसशोषक किडी व किडींची अंडी अवस्थेचे निर्मूलन होते. पर्यावरणपूरक कीड नियंत्रण झाल्याने सकस व विषमुक्त भाजीपाला उत्पादित होतो व शेती मालास सेंद्रिय म्हणून उत्तम दरही मिळतो.


## हवामान बदल आणि शेततळे

वातावरणामध्ये होत असलेला बदल आणि पिकांवर होणारा त्याचा परिणाम हे काही नवीन नाही. हवामान बदल ही काही एका दिवसात किंवा वर्षांमध्ये होणारी घटना नाही. वर्षानुवर्षे होणारी वृक्षतोड, औद्योगीकरण/शहरीकरण, मोठ्या प्रमाणात होणारे कार्बन उत्सर्जन इत्यादींचा हा परिणाम आहे. आजच्या परिस्थितीत नुसते कारणे माहीत असून चालत नाही तर त्यामुळे होणाऱ्या परिणाम सुद्धा माहित असणे आवश्यक आहे.

हवामान बदलामुळे होणारे परिणाम :हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांमध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्जन्याची अनियमितता. मान्सून हा जून मध्ये येऊन ऑक्टोबर, नोव्हेंबर पर्यंत राहायचा, पण आता तो जुलै ऑगस्ट महिन्यापासून वर्णी देतो. त्यामुळे पिकावर सुद्धा त्याचा परिणाम होऊ लागला आहे. पेरणी जून मध्ये होऊन सुद्धा पाण्याची असलेली कमतरता यामुळे पिके जळून जाऊ लागली आहेत. परिणामी त्यांचे उत्पन्न घटले. अशावेळी पाण्याची कमतरता/गरज पूर्ण करण्यासाठी शेततळे हा एक उत्तम उपाय आहे.

शेततळे आणि उपयोग :पावसाचे पाणी वाहून जाण्यापासून रोखता व साठवता येते. कोरड्या हंगामात आवश्यकतेनुसार विश्वसनीय जलस्रोत म्हणून कामी येतो. दुष्काळी भागात पाणीटंचाईच्या विरोधात आशेचा किरण म्हणून काम करते. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लावते. सातत्यपूर्ण उत्पादन राखण्यास मदत होते. जमिनीचे आरोग्य व उत्पन्नात सुधारणा होते. पिकांमध्ये विविधता येते. पशुधन वाढी करता उपयोग होतो. मत्स्यपालन आणि सिंचन अशी दुहेरी उत्पादने घेता येतात.

शेततळ्यासाठी आवश्यक जागेचे निकष



:शेततळे खोदण्यासाठी जागेची निवड खूप महत्त्वाची आहे म्हणून शेततळे घेण्यापूर्वी शेतकऱ्यांनी खालील निकषांचा विचार करणे गरजेचे आहे. ज्या जमिनीतून पाणी पाझरण्याचे प्रमाण कमी आहे अशी जमीन असलेल्या जागेची निवड करावी. काळी जमीन ज्यात चिकन मातीचे प्रमाण जास्त आहे, अशी माती चांगली असते. मुरमाड, वालुकामय सच्छिद्र खडक असलेल्या जमिनीची निवड करू नये.

जमिनीचा उतार तीन टक्क्यांपेक्षा कमी असावा. नाल्याच्या प्रवाहात शेततळे घेण्यात येऊ नये. शेततळ्याची पाणी साठवण क्षमता पाणलोट क्षेत्रातून वाहून येणाऱ्या पाणी क्षमते पेक्षा जास्त असावी. ज्यावेळी शेतातून किंवा शेताजवळून नाला वाहत आहे आणि नाल्याचा उतार तीन ते पाच टक्क्यापर्यंत आहे. तेव्हा नाल्यातील प्रवाहाला काटकोनात बांधून शेततळे तयार करता येते. तसेच शेतात मध्यभागी किंवा एक बाजूला खोलगट जागा असेल, तर खड्डा खोदून शेततळे तयार करता येते.

शेततळे तयार करताना शेततळ्याची जागा निवडणे व त्याचा आकार ठरविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शेततळ्यात वाहून येणारे पाणी जास्त दिवस थांबावे या दृष्टीने पाण्याचा पाझर कमी असलेल्या चिबड जमिनीत शेततळे घ्यावे. अन्यथा माती किंवा पॉलिथिनचे अच्छादन वापरून पाझर कमी करता येईल अशी जमीन निवडावी. त्याचबरोबर साठविलेल्या पाण्याचा वापर सोयीस्कर करता येईल असे ठिकाण निवडावे. शेततळ्याचा आकार ठरवितांना शेततळ्यात वाहून येऊ शकणारा अपधाव, बाष्पीभवनाद्वारे आणि पाझरामुळे होणारा व्यय आणि आपल्याला आवश्यक असणारे पाणी या सर्व बाबींचा ताळमेळ घालून मगच निर्णय घ्यावा.

शेततळे आणि त्याचे प्रकार :शेततळ्याचे आकारमान हे लांबी रुंदी उंची या सूत्राद्वारे काढले जाते. आकारमानानुसार विचार करता शेततळे व त्याचे विविध प्रकार पडतात.

तटबंधी असलेले शेततळे :अश्या प्रकारची शेततळे हि अपधावेच्या विरुद्ध दिशेला बांधून त्याला तटबंधी करतात. तसेच ह्याचे आकारमान, साठवण क्षमतेच्या गरजेवर ठरवतात. सौम्य व माध्यम उतार अश्या प्रकारच्या शेततळ्यासाठी योग्य असतो. अशा प्रकारचे शेततळे आकृती क्रमांक एक मध्ये दाखविल्याप्रमाणे असते.

खोदलेले शेततळे :ह्या प्रकारच्या शेततळ्याना योग्य प्रकारचा आकार असतो म्हणजे, आयताकार, चौकोनी इत्यादी. पाणी आत येण्यासाठी इनलेट व पाणी बाहेर काढण्यासाठी आउटलेट असते. याचे बांधकाम करण्यासाठी, माती जमिनीमधून खोदून काढतात आणि तीच माती तटबंधी बनवण्यासाठी वापरतात. याची उंची व आकार आवश्यक पाण्याच्या साठवण क्षमतेवर अवलंबून असते.

डग आउट शेततळे :सौम्य उतार असलेली जमीन अशाप्रकारच्या शेततळ्यासाठी योग्य असते. उतार ज्या दिशेला असतो त्या दिशेला ह्याचे बांधकाम करता. अशा प्रकारचे शेततळे आकृती क्रमांक २ (अ) मध्ये दाखविल्याप्रमाणे असते.

सरफेस शेततळे : जेव्हा अपधाव शेतामधून वाहत जाऊन एखाद्या खड्ड्यामध्ये साठतो त्याला सरफेस पॉन्ड म्हणतात. ह्याची खोदण्यासाठी लागणारी उंची कमी कमी असते. चढउताराची जमीन ह्या साठी योग्य असते. याला इनलेट नसले तरी चालते पण आउटलेट असणे आवश्यक आहे.




### महत्वाच्या घटना

१६६१ : प्रिन्स सेसी या शास्त्रज्ञाने प्रथमच दुर्बिणीसाठी टेलिस्कोप ही संज्ञा वापरली.

१६६५ : सुप्रसिद्ध पुरंदरच्या वेढ्यामधे दिलेरखान पठाणने वज्रमाळ किल्ला जिंकला.

१७३६ : चिमाजीअप्पांनी मोघल बादशहाचा हस्तक जंजिरा येथील सिद्दीसाताचा पराभव करुन मराठी सत्तेचा दरारा बसविला.

१८६५ : जॉन विल्कस बूथने अब्राहम लिंकनवर गोळी झाडली. लिंकन दुसर्या दिवशी मृत्यू पावला.

१९१२ : आर.एम.एस. टायटॅनिकची हिमनगाशी टक्कर. बोटीला भगदाड पडून बुडु लागली.

१९४४ : मुंबईच्या बंदरात उभ्या असलेल्या बोटीवर महाभयानक विस्फोट. ३०० ठार. त्याकाळच्या २ कोटी पाउंडचे नुकसान.

१९४४ : मुंबई गोदीत उभ्या असलेल्या 'फोर्ट स्टिकिन' या मालवाहू जहाजावर दुपारी ४ वाजुन ५ मिनिटांनी भीषण स्फोट होऊन ३०० जण ठार झाले आणि (त्याकाळच्या) सुमारे २ कोटि पौंडा इतके आर्थिक नुकसान झाले.

१९८६ : बांगलादेशमध्ये १ किलो वजनाच्या अतिप्रचंड गारांचा वर्षाव. ९२ ठार. गारांच्या वजनाचा हा विक्रम अजुन अबाधित आहे.

१९९५ : टेबल टेनिसमधे सलग ६,६७० रॅलीज करण्याचा जागतिक विक्रम डॉ. रमेश बाबू यांनी पुण्यात नोंदवला.

२००८ : भारतातील कोलकत्ता व बांगलादेशाची राजधानी ढाका या दोन देशादरम्यान रेल्वे सेवा सुरु करण्यात आली.

२०१० : पश्चिम बंगाल, उडीसा, झारखंड आणि बिहार राज्यात आलेल्या चक्रवर्ती वादळामुळे सुमारे १२३ लोकांचे निधन झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२९ : क्रिस्टियन हायगेन्स डच गणितज्ञ, खगोलविद्? आणि पदार्थवैज्ञानिक, लंबकाच्या घड्याळाचा शोध (मृत्यू: ८ जुलै १६९५)

१६७५ : छत्रपती शिवाजी महाराज यांचे धाकटे पुत्र छत्रपती राजाराम भोसले यांच्या दुसऱ्या पत्नी राणी ताराबाई भोसले यांचा जन्मदिन.

१८३३ : व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता रॉस लोव्हिस मंगल्स व्हीसी यांचा जन्मदिन.

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे खंदे नेते, अस्पृश्य समजल्या जाणार्या जातितील पहिले मॅट्रिक व पहिले पदवीधर, इंग्लंडमध्ये वकिलीतील बॅरिस्टरची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ६ डिसेंबर १९५६)

१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार.

१८९८ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या आझाद हिंद सरकारमधील प्रसिद्धी व प्रचार प्रमुख सुब्बीर अप्पादुराई यांचा जन्मदिन.

१९०७ : भारतीय कम्युनिस्ट चळवळीचे प्रारंभिक नेते व माजी सरचिटणीस पूरणचंद जोशी यांचा जन्मदिन.

१९१४ : शांता हुबळीकर अभिनेत्री (मृत्यू: १७ जुलै १९९२)

१९१९ : शमशाद बेगम पार्श्वगायिका (मृत्यू: २३ एप्रिल २०१३)

१९२२ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९६९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (मृत्यू: १८ जून २००९ सॅन अन्सेल्मो, कॅलिफोर्निया, यू. एस. ए.)

१९२७ : द. मा. मिरासदार विनोदी लेखक (मृत्यू: )

१९३३ : सर्जनशील कला अकादमीचे संस्थापक-प्राचार्य अनिल कुमार दत्ता यांचा जन्मदिन.

१९४२ : मार्गारेट अल्वा केंद्रीय मंत्री व राजस्थानच्या राज्यपाल

१९४३ : रामदास फुटाणे वात्रटिकाकार

१९५७ : भारतीय मल्याळम स्त्रीवादी लेखिका आणि नाटककार के. सरस्वती अम्मा यांचा जन्मदिन.

१९५७ : भारतीय अवकाश वैज्ञानिक आणि भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे अध्यक्ष तसचं, विक्रम साराभाई स्पेस सेंटर आणि लिक्विड प्रोपल्शन सिस्टम सेंटरचे माजी संचालक कैलासावादिव शिवन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५० : भारतीय तत्त्ववेत्ते योगी रमण महर्षी तथा वेंकटरमण अय्यर समाधिस्थ झाले. चैत्र व. १२ शके १७८३ (जन्म: ३० डिसेंबर १८७९)

१९६२ : सर मोक्षगुंडम्? विश्वेश्वरैया, भारतीय अभियंता.

१९६२ : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या अभियंते, विद्वान, मुत्सद्दी आणि मैसूर संस्थानचे दिवाण

१९६३ : केदारनाथ पांडे तथा राहूल सांकृतायन इतिहासकार (जन्म: ९ एप्रिल १८९३)

१९९७ : चंदू पारखी चित्रपट आणि नाट्य अभिनेते (जन्म:)

१९९८ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, छायाचित्रकार व पटकथालेखक नितीन बोस यांचे निधन.

२०१३ : राम प्रसाद गोएंका उद्योगपती (जन्म: १ मार्च १९३०)

# १८ तासांच्या अध्ययनातून फुले-आंबेडकरांचे आदर्श पुनर्जिवीत

## तुलसी शैक्षणिक समूहाचा प्रेरणादायी उपक्रम
## ३०० विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन केला १८ तासांचा अभ्यास

बीड । प्रतिनिधी

येथील तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने गुरुवार दि.१० रोजी तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे एक अनोखा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी सलग १८ तास अखंड अध्ययन करून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विशेष अभिवादन केले.

सकाळी ६ वाजता सुरू झालेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी रात्री १२ वाजेपर्यंत निरंतर अभ्यास केला. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी संस्थेने डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज यांसारख्या महापुरुषांच्या जीवनावर आधारित पुस्तके उपलब्ध करून दिली. या दरम्यान विद्यार्थ्यांना संस्थेकडून



नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचा अल्पाहारही पुरवण्यात आला.या कार्यक्रमात ३००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हा उपक्रम मूलतः २६ जुलै २०२४ रोजी छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती निमित्त १ तासाच्या अभ्यास सत्रा पासून सुरू झाला. विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे हे सत्र क्रमाक्रमाने ३ तास, ६ तास आणि शेवटी १८ तासांच्या अभूतपूर्व कार्यक्रमात रूपांतरित झाले. तुलसी समूहाचे संचालक प्रा.प्रदीप रोडे यांनी सांगितले, हा केवळ अभ्यासाचा कार्यक्रम नसून, फुले-आंबेडकरी विचारांची ज्योत पेटवणारा सामाजिक उपक्रम आहे.त्यांनी आगामी ७ नोव्हेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन आणि १४ एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती रोजी अशाच प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे आश्वासन दिले. हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्व तुलसी समूहाच्या टीमचे आभार मानले. या उपक्रमास तुलसी समूहातील ग्रंथालय प्रशासन, प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

बीड। प्रतिनिधी

अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.सदरील जयंती साठी मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड,मंगेश बबनराव जाधव जिल्हा परीविक्षा अधिकारी, संतोष वारे बाल कल्याण समिती सदस्य,बालीका शिंधीकुंमठे शिक्षीका, तौफीक हमीद शेख काळजी वाहक,पौर्णिमा कांबळे,शेख नदीम लतीफ,संतोष शिंदे ,माधुरी शिंदे.आदी उपस्थित होते.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयात महात्मा फुले यांची जयंती साजरी

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ११ एप्रिल रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. त्यांच्या हस्ते महात्मा फुलेंच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर अतिथी प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर हजारे, डॉ. अनिल तळेकर, डॉ. सखाराम वांढरे, उपप्राचार्य प्रो. सतिश माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, प्रा. मनिषा गाढवे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. कुशाबा साळुंके, प्रो. प्रशांत पाटील, डॉ. पद्माकर ससाणे उपस्थित होते.महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयातील गरीब व होतकरू अशा पदवीधर विद्यार्थिनीच्या विवाहासाठी कर्मचारी कल्याण समितीच्या निधीतून २५००/- रुपये अर्थसहाय्य देण्यात येणार आहे अशी घोषणा प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी याप्रसंगी केली. सूत्रसंचालन डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभार प्रा. मनिषा गाढवे यांनी मानले. अभिवादन कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१९०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०७/०४/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) राम दगडु राठोड सर्व्हे नं. ९९ सहन प्लॉट नंबर ३५ सिटी सर्व्हे नंबर २४८२ न.प.मि.न.१८-१३६-३५ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नंबर ३४ चा भाग
दक्षिण-याच सर्व्हे नंबर मधील भाग
उत्तर - प्लॉट नंबर ३५ मधील उर्वरित भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड



**जाहीर प्रगटन**
**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ६२७/२०२५**
**(मार्फत ॲड. आर. के. बडे)**
CNR No. MHBI020000012572025
**राहीबाई पांडुरंग मेंगडे व इतर ४ वि. निरंक**

अर्जदार : १. राहीबाई भ्र. पांडुरंग मेंगडे, वय ८० वर्षे, धंदा-घरकाम, रा. मेंगडेवाडी तहत च-हाटा ता. जि. बीड, २. नवनाथ पि. पांडूरंग मेंगडे, वय-५० वर्षे, धंदा-शेती, रा. मेंगडेवाडी तहत च-हाटा ता. जि. बीड, ३. गोरख पि. पांडुरंग मेंगडे, वय-४४ वर्षे, धंदा-शेती, रा. मेंगडेवाडी तहत च-हाटा ता. जि. बीड, ४. चांगुणाबाई भ्र. देविदास धुमाळ, वय-५२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. पिंपळवाडी ता. जि. बीड, ५. सुनंदा भ्र. राजेंद्र धुमाळ, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळवाडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत पांडूरंग बापुराव मेंगडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत पांडूरंग बापुराव मेंगडे यांचा मृत्यु दिनांक २८/११/२०२४ रोजी राहते घरी मेंगडेवाडी ता. जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ हि मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत व अर्जदार क. ४ व ५ या मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत पांडूरंग बापुराव मेंगडे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक 'राज्य लोकतंत्र' मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख ०९/०५/२०२५**

**आज दिनांक ०९ माहे एप्रिल २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

स्वाक्षरित
**क लिपीक**

(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड


## माजलगाव मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन



माजलगाव । प्रतिनिधी

शिक्षण,समता आणि न्याय यांचा बुलंद आवाज म्हणजे क्रांतीसुर्य महात्मा फुले.अंधश्रद्धा, जातिभेद आणि अज्ञानाविरुद्ध निर्भीडपणे उभे राहून समतेच्या सूर्याला दिशा दाखवणारे थोर समाजसुधारक, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती निमित्त दि ११ एप्रिल शुक्रवार रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांना कृतीच्या आचरणात उतरवण्याचा संकल्प करत अनेक मान्यवरांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात अभिवादन करण्यात आले.यावेळी माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके, शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले,डॉ.भोपळे,धनंजय सोळंके, आझाद क्रांतीसेनेचे शहराध्यक्ष अशोक ढगे,किसन भिसे,विलास नेमाने,लक्ष्मण गायकवाड यांची उपस्थिती होती.

## पांगरी येथे रविवार पासून हनुमान यात्रा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या पांगरी (मारुतीची) ता.शिरूर येथील जागृत देवस्थान व भाविक- भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री.हनुमान या देवताच्या यात्रा प्रित्यर्थ प्रतिवर्षाप्रमाणे (वर्ष ६२) याही वर्षी रविवार दि.१३/०४/२०२५ ते मंगळवार दि.२२/०४/२०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व लक्ष्मण शक्ती सोहळा संपन्न होत आहे.या निमित्त येथे दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन,७ ते ७:३० वाजता विष्णुसहस्रनाम,८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण,१२ ते १ भोजन,२ ते ५ चरित्र कथा सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ,७ ते ८ भोजन,रात्री ८ ते ९ भावार्थरामायण,९ ते ११ हरिकिर्तन, ११ ते ४ हरिजागर इत्यादी कार्यक्रम संपन्न होणार आहेत.श्री हनुमान यात्रा उत्सवाची सांगता मंगळवार दि.२२/०४/२०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.महंत विठ्ठल महाराज मठाधिपती गहिनीनाथ गड यांचे काल्याचे किर्तन आणि व नंतर महाप्रसादाने होणार आहे.या ठिकाणी दररोज रात्री ९ ते ११ यावेळी पुढील प्रमाणे प्रसिद्ध नामांकित किर्तनकारांची किर्तने होणार आहेत. रविवार दि.१३/०४/२०२५ रोजी ह.भ.प.दयानंद महाराज कोरेगावकर कर्जत,सोमवार दि.१४/०४/२०२५ ह.भ.प.विशाल महाराज खोले मुक्ताईनगर,मंगळवार दि.१५/०४/२०२५ सायंकाळी ६ ते ८ या वेळेस समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर,बुधवार दि.१६/०४/२०२५ रोजी रात्री ९ ते ११ ह.भ.प.इंद्रजीत महाराज रसाळ वडवणी,गुरुवार दि.१७/०४/२०२५ रोजी ह.भ.प.महेंद्र महाराज मळेकर भगवानगड,शुक्रवार दि.१८/०४/२०२५ महंत महामंडलेश्वर १००८ ह.भ.प.त्रिविक्रमानंद महाराज शास्त्री गणेशानंदगड पिंपळनेर,शनिवार दि.१९/०४/२०२५सुनिताताई महाराज आंधळे राष्ट्रीय किर्तनकार आळंदी देवाची,रविवार दि.२०/०४/२०२५ ह.भ.प.सोपान महाराज शास्त्री हिंगोली,सोमवार दि.२१/०४/२०२५ सायंकाळी ६ ते ८ या वेळेत ह.भ.प.काशिनाथ महाराज शास्त्री गणेश गड नागतळा या अखंड हरिनाम सप्ताह सोहळा व यात्रा उत्सवाचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ पांगरी,घोळेवाडी,जाधववाडी, भराटवाडी,गायकवाडी,आनंदवाडी, भिलारवाडी,जेधेवाडी यांनी केले आहे.

## भाटवडगाव ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक रस्ता अडविला

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक रस्ता अडविला प्रकरणी चौकशी अधिकारी राजेंद्र पराडकर यांनी सर्व प्रकाराची चौकशी करून संबंधित ग्रामपंचायत,प्लॉट धारक व तक्रारदार यांनी पुरावे पाच दिवसांत सादर करावेत अशा सुचना देऊन ज्या रस्तावर शेड उभारून रस्ता बंद केला त्या ठिकाणा चा पंचनामा केला आहे

या विषय अधिक माहिती अशी की, तालुक्यातील भाटवगाव ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक रस्ता अडवून रहिवासी व विद्यार्थ्यांची गैरसोय करून रहदारी बंद केल्याने सामाजिक कार्यकर्ते सुरेश साळवे व रमेश साळवे यांनी तक्रार करून उपोषण केले होते या ची पंचायत समिती ने दखल घेऊन या प्रकरणाची चौकशी साठी विस्तार अधिकारी पंचायत राजेंद्र पराडकर यांनी काल शुक्रवारी चौकशी सुरू केली असून ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन मुळ रेकॉर्ड तपासणी केली व ज्या ठिकाणी रस्ता अडविला आहे त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून जायमोक्याचा पंचनामा करून पाच दिवसांत या प्रकरणाची सर्व कागदपत्रे सादर करावी असे सुचीत केले आहे या वेळी सरपंच, सदस्य अनभुले, ग्रामसेवक साहेबराव चव्हाण, तक्रारदार सुरेश साळवे, रमेश साळवे, राजेश राठोड, विजय दळवी,प्रशांत जगनाडे, रोहित जोशी, पत्रकार तानाजी सिरसट, रमेश पवार, कमलेश चव्हाण, सुरेश राऊत यादी उपस्थित होते.

## प्रत्येकाने एकदातरी रक्तदान करावे

### जयभीम महोत्सवात मान्यवरांचे प्रतिपादन



बीड। प्रतिनिधी

रक्तदान सर्वात श्रेष्ठ दान आहे, त्याने रुग्णांचा जीव वाचतो.त्यामुळे प्रसत्येकाने आपल्या आयुष्यात एकदातरी रक्तदान करुन, गरजू रुग्णांचा जीव वाचविण्याकरिता सामाजिक योगदान द्यावे असे विचार रक्तदान शिबीर उपक्रमात मान्यवर व्यक्तींनी व्यक्त केले. बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधित जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार (दि.११) रोजी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात मान्यवर बोलत होते.या कार्यक्रमाल अध्यक्ष म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, उदघाटक म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.महेश माने, डॉ.प्रदिप वाघमारे, डॉ.सुनिल गायकवाड, डॉ.हनुमंत पारखे, गौतम चोपडे, प्रदिप रोडे, डॉ.प्रांजल किमगावकर,प्रविण टाकणखार, एस.टी. गायकवाड, प्रा.अशोक गायकवाड आदी उपस्थित होते.

उपस्थित आंबेडकरी जनतेला संबोधित करतांना मान्यवर म्हणाले की, बीड येथील जयभिम महोत्सवात प्रत्येकवर्षी रक्तदान शिबिर घेतले जाते. हा उपक्रम खरोखरच स्तुत्य आहे. बीडचा जयभिम महोत्सव स्वबळावर साजरा केला जात असून राज्याला एक आदर्श निर्माण करुन दिला आहे.

असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.दरम्यान या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून बीड जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीचे कर्मचारी सचिन सतकर, बिभीषण म्हात्रे, दादा कुमकर, सागर फुलपगारे यांनी सहकार्य केले.या रक्तदान शिबिराचे प्रस्ताविक विकास वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन सुमेध जोगदंड, सुनिल डोंगरे यांनी केले. आभार इंजि स्वप्निल चोपडे यांनी मानले दरम्यान जयभिम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.

## केज तालुक्याला रेल्वे मार्गाशी जोडण्याची केजवासीयांची मागणी

केज। प्रतिनिधी

केज हे बीड जिल्ह्याचे सर्वात जुने तालुका ठिकाण आहे. केज तालुक्यात पालेभाज्या-फळभाज्या सोबतच आता नवीन वैज्ञानिक शेती प्रयोग करून फळांची व पिकांची निर्मिती केली जात आहे. मात्र आधुनिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी केज तालुक्यात दळ ण-वळणासाठी अनुकूल असणारी रेल्वेची सेवा उपलब्ध नाही.

सध्या केंद्र शासनाने धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या २४० किमी च्या प्रस्तावित रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षणाला १४ फेब्रुवारी २०२५ च्या पत्रानव्ये मंजुरी दिली आहे. या अंतर्गत हा मार्ग धाराशिव-कळंब-बीड असा जाणार असेल तर तो धाराशिव-कळंब-केज-बीड असा करावा अशी कळंब व केजच्या जनतेची मागणी आहे. याशिवाय येडशी-कळंब-केज-



अंबेजोगाई-परळी किंवा अहमदनगर-पाटोदा-केज-अंबेजोगाई-घाटनांदूर या मार्गानेही केजला रेल्वे कनेक्टिव्हिटी दिली जाऊ शकते. केंद्रशासनाने यापैकी कोणत्याही एका योग्य व अनुकूल मार्गाने केज शहर व तालुक्याला रेल्वेसेवेशी जोडून द्यावे अशी मागणी केजच्या रेल्वे कृती समिती व केज विकास संघर्ष समितीने बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे आणि केज तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीसाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्याचा निर्धार केज तालुका रेल्वे कृती समिती व केज विकास संघर्ष समितीने केला आहे. निवेदनावर हनुमंत भोसले, डी एस साखरे, नासेर मुंडे, महेश जाजू, प्रतापराव पाटील, शेषराव घोरपडे, संपत वाघमारे यांच्यासह नागरिकांच्या सह्या आहेत.

## आष्टीत आज संविधान प्रचारक प्रा.मुक्ता कदम यांचे व्याख्यान

आष्टी। प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी.सार्वजनिक जयंती महोत्सव तथा भीम संदेश पर्व-२०२५ अंतर्गत आज शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ रोजी सायं.७ वा.आष्टीत संविधान प्रचारक तथा पत्रकार प्रा.मुक्ता कदम यांचे व्याख्यान होणारा आहे.आष्टी शहरातील भारतरत्न डा. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात होणाऱ्या या सर्व कार्यक्रमांना प्रचंड गर्दी होत आहे.भीम संदेश पर्व २०२५ महोत्सव हा सार्वजनिक जयंती महोत्सव समितीतर्फे आयोजित करण्यात आला आहे.या महोत्सवात रविवार दि.६ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध व्याख्याते तथा पत्रकार प्रा.संजय औटे सर यांचे व्याख्यान,सोमवार दि.७ एप्रिल रोजी परिवर्तनवादी कीर्तनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांचे व्याख्यान,मंगळवार दि.८ एप्रिल रोजी सप्तखंजिरी वादक,समाज प्रबोधनकार डॉ.रामपाल महाराज यांचा कार्यक्रम झाला आहे.बुधवार दि.९ एप्रिल २०२५ रोजी युगक्रांती सास्कृतिक युवा मंच,शाहिरी जलसा आकाश पवार यांचा कार्यक्रम,गुरुवार दि.१०



एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका सपना खरात यांचा कार्यक्रम झाला आहे.आज शुक्रवार दि.११ एप्रिल २०२५ रोजी आष्टी येथील संगीतकला साधना मंडळाचे मार्गदर्शक संगीत विशारद आदिनाथ औटे सर व सर्व कलाकार यांचा संगीत भजन झाले.आज शनिवार दि.१२ एप्रिल २०२५ रोजी संविधान प्रचारक तथा पत्रकार प्रा.मुक्ता कदम यांचे व्याख्यान होणार आहे. सोमवार दि.१४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.३० वा.मुख्य निलध्वजारोहन व बुद्ध वंदना होणार आहे.यावेळी कालकथित रघुनाथ निकाळजे बंधु स्मृती पुरस्कार वितरण समारंभ संपन्न होणार आहे अशी माहिती सार्वजनिक जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष सरपंच परिवंत गायकवाड व पदाधिका-यांनी दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने सार्वजनिक जयंती महोत्सव तथा भीम संदेश पर्व -२०२५ अंतर्गत अष्टीकरांना विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या आणि कलावंतांच्या ज्ञान आणि मनोरंजनाचा आस्वाद घेता येणार आहे.आष्टीकरांसाठी ही अलौकिक पर्वणी आणि मेजवानी असून मोठ्या संख्येने उपस्थित राहून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जयंती महोत्सव उत्स्फूर्त साजरा करण्यासाठी प्रतिसाद द्यावा असे आवाहन अध्यक्ष परिवंत गायकवाड व संयोजकाच्यावतीने करण्यात आले आहे.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त अंबाजोगाईत अभिवादन रॅली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी येथील महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांच्या वतीने शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल रोजी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त काढण्यात आलेल्या अभिवादन रॅलीने अंबाजोगाईकरांचे लक्ष वेधून घेतले. उत्स्फूर्त प्रतिसाद देत या अभिवादन रॅलीत महिला भगिनी व युवक त्यांच्या २५० दुचाकींसह सहभागी झाले होते.

अंबाजोगाईत शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ वाजता योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी वसतिगृहातील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास शांतीनाथ बनसोडे यांच्या हस्ते अभिवादन व पुष्पांजली अर्पण करून जयंती उत्सव सोहळ्यास प्रारंभ



करण्यात आला. यावेळी बनसोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन ही केले. याप्रसंगी सुत्रसंचालन बी.के.मसने यांनी केले. तर उपस्थितांचे आभार राम वसंतराव घोडके यांनी मानले. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता अभिवादन बाईक रॅली काढण्यात आली. ही बाईक रॅली साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे चौक, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, रणवीर तानाजी मालुसरे चौक, पाटील चौक, योगेश्वरी देवी मंदिर, सिमेंट रस्ता गुरूवार पेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे निघून संघर्षभूमी येथे विश्व वंदनीय तथागत गौतम बुद्ध, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करून या रॅलीचा समारोप झाला. बाईक रॅली ज्या ज्या चौकातून काढण्यात आली. त्या सर्व चौकातील नामफलकाला पुष्पहार अर्पण करून उपस्थितांकडून अभिवादन करण्यात आले. अभिवादन रॅली सवाद्य, शिस्त पाळून काढण्यात आली. उघड्या जीप मध्ये लहान चिमुकल्यांनी महात्मा जोतिबा फुले व माता सावित्रीमाई फुले यांची वेशभूषा परिधान केली होती. तसेच याप्रसंगी फुलांनी सजविलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये महात्मा फुले यांचा अर्धाकृती पुतळा, दर्शनी भागावर भव्य कटआऊट व अर्धाकृती पुतळ्या खालील स्तंभावर म.फुले यांचे प्रबोधनपर विचार, संदेश देणारे घोषवाक्य सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. अभिवादन रॅलीसाठी महिला भगिनी, युवक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. रॅली आयोजनासाठी सर्व सन्माननीय समाज बांधवांनी पुढाकार घेतला. त्यांना प्रकाश बलुतकर, विष्णु राऊत, अंकुश घोडके, राम जिरे, संतोष राऊत, अनंत मसने, डॉ.दत्तात्रय मसने, भागवत मसने, करपुडे सर, ज्ञानेश्वर जिरे, बालासाहेब माळी, डॉ.फुटाणे सर, मधुकर घोडके, बंडू मसने, रमेश जिरे, बलुतकर सर, मिलिंद बाबजे, पंकज राऊत, सुशील शिंदे, नितीन जिरे, राम घोडके, मंगेश बलुतकर, अभय जिरे, निवृत्ती जिरे, संदेश डाके, शरद माळी, भारत घोडके, श्रीकृष्ण घोडके, बळीराम धनवडे, आकाश चोपने, गजानन घोडके, योगेश कातळे, अक्षय घोडके, प्रविण चोपने, बालाजी घोडके, बालाजी जिरे, दिपक आरसुडे, ऋषि मसने, कृष्णा मसने, नवनाथ माळी, अनिकेत घोडके, पवन घोडके, अक्षय चोपने, पवन जिरे, दामोदर माळी, भागवत जिरे, किरण भालेकर, सुधीर माळी, रोहन माळी, समाजसेवक बाळु फुलझळके, दत्तात्रय बनसोडे, शाहीर तुकाराम, प्रविण जोगदंड, राहुल जिरे, अतुल राऊत, सतिश राऊत, शिवराज राऊत, संदीपान देशमाने, गोविंद पाथरकर, ऋषि पाथरकर, किरण पाथरकर, नंदकुमार बलुतकर आदींसह महात्मा ज्योतिबा फुले सेवा संघ, अंबाजोगाई यांचे सहकार्य लाभले.

## सोन्याबापू पवळ यांचे निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील सेवा निवृत्त आरोग्य सेवक सोन्याबापू



सोपान पवळ वय ६२ यांचे गुरुवार दि.१० एप्रिल रोजी रात्री ११.२५ वाजता अहिल्यानगर येथे उपचार घेत असताना हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी ९ वाजता सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पश्चात पत्नी आशाबाई, तीन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. पत्रकार प्रेम पवळ व अमोल पवळ,प्रतिक पवळ सह मुलगी प्रिया पवळ यांचे ते वडील होते.

## समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन मंदिर बांधू-आ.विजयसिंह पंडित

### गेवराईतील गवळी समाज बांधवाचे पंडित यांना निवेदन देऊन मागणी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील विरशैव लिंगायत गवळी समाजाला आजवर हक्काचे समाज मंदिर व जागा मिळाली नव्हती,मात्र आ.विजयसिंह पंडित यांच्यामुळे गवळी समाज बांधवांना आता हक्काचे समाज मंदिर व जागा मिळणार आहे.शुक्रवार रोजी गवळी समाज बांधवांनी आ.विजयसिंह पंडित यांची भेट घेत निवेदन दिले.यावेळी समाज बांधवांना उत्तर देताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की,गवळी समाज बांधवांना लवकरच गेवराई शहरात समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन समाजाचे मंदिर उभारण्यात येईल असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.दरम्यान मागिल अनेक वर्षांपासून



हि मागणी गवळी समाज बांधव विविध राज्यकर्त्यांना करत आले आहेत.मात्र आ.विजयसिंह पंडित यांनी गवळी समाजाच्या मंदिरासाठी जागा व मंदिर उभारण्यासाठी आता पुढाकार घेतल्याने शहरातील गवळी समाज बांधवांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

विरशैव लिंगायत गवळी समाज बांधवांचे गेवराई विधानसभा मतदारसंघात केवळ गेवराई शहरातच दुध व्यवसायामुळे वास्तव्य आहे.शहरात गधळी समाज बांधवांच्या मंदिरासाठी जागा देण्यात येऊन मंदिर उभारण्यात यावे यासाठी ◄◄ पान ३ वर

## जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात चुल पेटवून गॅस दरवाढीचा शिवसेनेकडून जाहीर निषेध

बीड । प्रतिनिधी

भाजपशासीत केंद्र सरकारने पन्नास रुपयांनी गॅस दरवाढ करून सामान्य नागरिकांची फसवणुक केली आहे. या दरवाढीचा निषेध म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज बीड च्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात चुल पेटवून महिलांनी भाकरी थापुन शासनाच्या या दरवाढी चा निषेध केला.

निवडणुकी पूर्वी मोठमोठी आश्वासने देऊन सामान्य जनतेची दिशाभूल करून भाजपशासित केंद्र सरकार सत्तेवर आले. सत्तेवर येताच या सरकारने आपले रंग दाखवायला सुरुवात केली. पेट्रोल दरवाढ, जीएसटी वाढ, शेती उत्पादन निर्यात दरवाढ, गॅस दरवाढ करून सामान्य नागरिक, व्यापारी, शेतकऱ्यांची लुट चालु केली असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले. ही दरवाढ तात्काळ मागे घेऊन सामान्य महिलांना दिलासा मिळावा म्हणून आजच्या



### भाजप सरकार सामान्य जनतेची लुट करत आहे - उल्हास गिराम

आंदोलनात मोठया प्रमाणात महिलांनी ही सहभाग नोंदवला, निषेध म्हणून चुल मांडून भाकरी थापुन जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी महिला आघाडी च्या जिल्हा संघटक मीराताई नवले, प्रमिलाताई माळी, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, राजेभाऊ माहुवले, आदिनाथ खेडेकर, संजय महाद्वार, तालुका प्रमुख सोपान काका मोरे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, गणेश जाधव, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, मशरूभाई पठाण, सारंग बडे, नय्युम पठाण, गणेश घुंबर्डे, हनुमान काशीद, राजेश कोकणे, अक्षय काशीद सतीश परदेशीं, मुकुंद पाटील, प्रतीक वाघमारे सह शिवसैनिक मोठया प्रमाणावर उपस्थित होते.



बीड : भारतीय स्त्री शिक्षणाचे जनक, सत्यशोधक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आ.संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.११) रोजी बीड शहरातील पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, प्रा.प्रदीप रोडे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी ठोकळ, माजी नगरसेवक विष्णू वाघमारे, गायकवाड, संदीप दुधाळ, दत्ता शिंदे, अवसरमल सर, प्रा.रंजित आखाडे, यादव, कांबळे, गवळी आदी उपस्थित होते.

## साडेचार कोटींची अफू लागवड आरोपी तिडकेला जामीन मंजुर

**बीड । प्रतिनिधी**

**साडेचार कोटी अफू लागवड प्रकरणातील धारूर तालुक्यातील पिंपर वाडा येथील आरोपी रामहरी कारभारी तिडके याला न्यायालयाने जमीन मंजूर केला आहे.**

सदर प्रकरणाची माहिती अशी की धारूर तालुक्यातील सर्वे नंबर ३३ या शेतात सुमारे चार कोटी बत्तीस लाख रुपयाची अफूची लागवड केल्या प्रकरणी रामहरी कारभारी तिडके यांच्याविरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात गुन्हा नं. ५७/२०२५ नुसार गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी आरोपीच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ बाळासाहेब कोल्हे, प्रभाकर आंधळे आणि संजय उर्फ चंदू जटा पाटील यांनी काम पाहिले. त्यांना विधीज्ञ सुदर्शन मुंडे, गणेश कोल्हे, सचिन केकान, विधीज्ञ सौ.उषा नामदेव नेहरकर (आंधळे) यांनी सहकार्य केले.

सदर प्रकरणी न्यायालयातअर्ज क्रमांक ४६/२०२५ नुसार दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी केज न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.अफू लागवड प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेचे या निकालाकडे लक्ष लागले होते.

## स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यो.शि.संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य अभिजित जोंधळे, प्राचार्य पी.आर.थारकर आदी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना जोंधळे म्हणाले की, पदवी घेऊन ज्ञान, ◄◄ पान ३ वर








# राक्षसभुवन येथे भक्ती आणि शक्तीचा संगम ; नारायणगडच्या नारळी सप्ताहाची पुष्पवृष्टी

**शिरूर । शंकर भालेकर**

**श्री.क्षेत्र नारायणगडाचा ७३ वा नारळी सप्ताहाची आज वैभवशाली थाटामध्ये पुष्पवृष्टी झाली आहे. नारायण गडाच्या भक्तांच्या मनातील भक्ती आणि संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी उभी राहणारी जनशक्ती या दोन्हीचा संगम एकत्रित आल्याने राक्षसभुवन येथील पुष्पवृष्टीचा कार्यक्रम भाविकाच्या मनाला चांगलाच भावला आहे किंबहुना आज तो बीड जिल्ह्यातील जनतेसाठी चर्चेचा विषय ठरला आहे.**

धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगडाचा ७३ वा नारळी सप्ताह यावर्षी शिरूर कासार तालुक्यातील मौजे राक्षसभुवन तांबा येथे आयोजित करण्यात आला असून या सप्ताहाची पुष्पवृष्टी आज संत-महंतांच्या उपस्थित व हजारो भाविक-भक्तांच्या साक्षीने झाली आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने मराठा समाजाच्या हितासाठी सदैव धडपडणारे नेतृत्व संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या गावामध्ये यावे आणि गावातील जनतेच्या वतीने महंत शिवाजी महाराज व मनोज जरांगे पाटील यांचे भव्य स्वागत आदरास्तित्य करण्यात व्हावे राक्षसभुवन करांचा नव्हे तर पंचक्रोशीतील जनतेचा गेल्या अनेक दिवसापासून घाट होता. तो आजचा दिन असल्यामुळे गुरुवारी अगदी सकाळपासूनच गावामध्ये मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. तर महंत शिवाजी महाराज व संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांना वैभवशाली थाटामध्ये गावात आणण्यासाठी श्रीक्षेत्र नारायण गडापासून राक्षस भुवन पर्यंत हेलिकॉप्टरचे नियोजन करण्यात आले होते व याच हेलिकॉप्टर मधून सप्ताहाच्या मंडपावरती,गावावरती





### राक्षसभुवन येथे भक्ती आणि शक्तीचा संगम; नारायणगडच्या नारळी सप्ताहाची पुष्पवृष्टी

पुष्पवृष्टी करण्यात आली.नियोजित वेळेमध्ये महंत शिवाजी महाराज व जरांगे पाटील उपस्थित झाल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने भव्य स्वरूपामध्ये स्वागतासाठी शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभा यात्रेचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांवरती प्रभाव पडावा यासाठी महाराष्ट्रभरातील नामांकित वाद्यांची, वेगवेगळे देखावे सादरीकरणांची पथके या शोभायात्रेमध्ये मोठा खर्च सहभागी करण्यात होते. तर गावातील सुवासिनी महिलांनी अंगावरती भगवे वस्त्र धारण करून या शोभा यात्रेची वेगळीच शोभा वाढवली होती. झेंड्या वाले, हंड्या वाले, कलशधारी महिला, तुतारी वाले, बँड वाले, त्याचबरोबर गावातील भजनी मंडळ हे या शोभा यात्रेचे खास आकर्षण वाढवत होते. गावामध्ये आपापल्या घराच्या अंगणामध्ये सडासमार्जन करून, रांगोळी फुलांची आरास टाकण्यात आली होती.फटाक्यांची आतिषबाजी गुलाल उधळण करत शोभायात्राचा मोठा उत्साह वाढवत होता.महंत शिवाजी महाराज व मनोज जरांगे पाटील यांची गावभर यांची वैभवशाली थाटामध्ये गावभर मिरवणूक काढल्यानंतर महंत शिवाजी महाराज यांचे हस्ते देवघरातील देवतांचे येथोचित पूजन करून करण्यात आले होते.ही शोभायात्रा भाविक भक्तांच्या मनाला भुरळ घालून सप्ताहाच्या मुख्य मंडपात आली तेव्हा एक आगळावेगळा क्षण या ठिकाणी अनुभवायला मिळत होता.

श्री.क्षेत्र नारायण गडाचे नूतन उत्तर अधिकारी हभप. महंत संभाजी महाराज यांच्या हस्ते टाळ,मृदंग,विना संत साहित्यातील ग्रंथांचे पूजन करून ब्रह्मवृंदांच्या मंत्र उच्चारात या ठिकाणी विधी पार पडला. त्यानंतर पुंडलिक वरदा असा एकच जयघोष झाला आणि समस्त भाविकांच्या वतीने सप्ताहाची पुष्पवृष्टी ◄◄ पान ३ वर

### जरांगे पाटलांनी भाष्य टाळले

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आज सप्ताहाच्या निमित्ताने राक्षस भवन येथे येतील आणि जनतेला आपल्या भाषणाच्या माध्यमातून काही ना काही तरी संदेश देतील अशी मोठी अपेक्षा सप्ताहासाठी आलेल्या भाविक भक्तांना होती. मात्र मनोज जरांगे पाटील यांनी सांगतेच्या दिवशी भाषण करू असे सांगून आज उपस्थित भाविकांची संवाद साधने टाळले. यामुळे जरांगे पाटलांच्या समर्थकांच्या चेहऱ्यावरती काहीशी निराशा दिसून आली.

### पहिल्याच दिवशी हजारो भाविकांनी घेतला भाजी भाकरीचा आस्वाद

सप्ताहाची पुष्पवृष्टी झाल्यानंतर या ठिकाणी ग्रामस्थांच्या वतीने आलेल्या भाविक भक्तांसाठी भाजी भाकरीची पंगती देण्यात आली होती. या भाजी भाकरीच्या पंगतीचा आलेल्या हजारो भाविक भक्तांनी श्रद्धेने आस्वाद घेऊन तृप्तीचा ढेकर दिला.

### माजीमंत्री शिवाजीराव पंडित यांची सप्ताहला भेट

राक्षसभुवन येथील श्री.क्षेत्र नारायणगडाचा ७३ वा नारळी सप्ताह आज मोठ्या थाटामध्ये आरंभीत करण्यात आला असून या सप्ताहाला माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी पहिल्याच दिवशी सदिच्छा भेट देऊन आपली श्री क्षेत्र नारायणगडाप्रती श्रद्धा व्यक्त केली आहे. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा येथोचित सन्मान करण्यात आला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# तनिषा भिसे मृत्यू प्रकरणानंतर त्या ६५० रुग्णालयांना नोटीसा

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातून धक्कादायक प्रकार समोर आला होता. प्रसुतीसाठी आलेल्या महिलेच्या कुटुंबाकडे डिपॉझिट म्हणून तब्बल दहा लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. कुटुंबाने अडीच लाख रुपये भरण्याची तयारी देखील दर्शवली होती, मात्र या महिलेला दाखल करून घेण्यात न आल्यानं वेळेत उपचार मिळू शकला नाही, आणि तिचा मृत्यू झाला असा आरोप तिच्या कुटुंबाकडून करण्यात आला होता. तनिषा भिसे असं मृत्यू झालेल्या महिलेचं नाव आहे, या घटनेनंतर राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे.

दरम्यान शासनाकडून प्राप्त झालेल्या अहवालामध्ये देखील या रुग्णालयावरच ठपका ठेवण्यात आला आहे. त्यानंतर या हॉस्पिटलचे डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा रुग्णालयाचे संचालक डॉ. धनंजय केळकर यांच्याकडे सोपवला होता. आता या प्रकरनानंतर पिंपरी चिंडवड महापालिकेनं मोठा निर्णय घेतला आहे. ६५० रुग्णालयांना नोटीस पाठवण्यात आली आहे.




तनिषा भिसेंच्या मृत्यूनंतर पिंपरी महापालिकेनं तब्बल ६५० रुग्णालयांना नोटिसा पाठवल्या आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने उपचारापूर्वी ऍडव्हान्ससाठी मुजोरी दाखवली आणि तनिषा भिसे यांचा या प्रकरणात बळी गेला. यानंतर आता महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून ६५० रुग्णालयांना नोटीस पाठवण्यात आली आहे. कोणत्याच रुग्णांकडून ऍडव्हान्स घेऊ नका, असं घडल्यास रजिस्ट्रेशन रद्द करण्यात येईल.असा इशारा पालिकेने या नोटीसीद्वारे रुग्णालयांना दिला आहे.

दरम्यान या प्रकरणात आता भाजप आमदार अमित गोरखे यांनी मोठी मागणी केली आहे. धर्मादाय आयुक्त आणि यमुना जाधव यांच्या एकत्रित समितीचा अहवाल त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला आहे, त्यामुळे तो अहवाल मला पाहायला मिळाला नाही. मात्र माता मृत्यू अहवाल अद्याप येणं बाकी आहे, तो आज येण्याची शक्यता आहे. येणारे सगळे अहवाल हे भिसे कुटुंबियांच्या बाजूने असतील. मंगेशकर कुटुंबीयांनी सामाजिक भान ठेवत, त्या दोन्हीही बालकांचे पालकत्व १८ वर्षापर्यंत स्वीकारावं अशी माझी वैयक्तिक मागणी आहे, असं गोरखे यांनी म्हटलं आहे.

# मंचरला भर दिवसा बिबट्याच्या जोडीचे दर्शन

मंचर : ऊसाला पाणी देण्यासाठी गेलेले शेतकरी बाबाजी दत्तात्रय खानदेशे( वय ४२)यांना पाहताच झोपलेले दोन बिबटे ताडकन उभे राहिले. अनाहूतपणे बिबटे पाहून खानदेशे यांची भंबेरी उडाली. क्षणातच प्रसंगावधान राखत स्वतःला सावरतथोडं मागच्या बाजूला पावले टाकत आलो. त्यानंतर धूम ठोकली. परमेश्वराची कृपा म्हणूनच आपला जीव वाचला. असे खानदेशे यांनी सांगितले.



मंचर (ता. आंबेगाव )येथे लोंढे मळयाच्या शेजारी असलेल्या खानदेशे वस्तीत शुक्रवारी (ता. ११ )संध्याकाळी साडेचार च्या सुमारास ही घटना घडली आहे.

गुरुवारी ( ता. १०) सकाळी सव्वादहा वाजता लोंढेमळा येथील प्राथमिक शाळेपासून ५० मीटर अंतरावर बिबट्याची जोडी आली होती. रात्री मेंढपाळाच्या कळपातील एका मेंढीचा बिबट्यांनी फडशा पडला आहे. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असल्याने ऊस पिकाला पाणी देणे गरजेचे होते. त्यामुळे शेताकडे जाताना आई रंजना व वडील दत्तात्रेय यांनी बाबाजी यांना सांगितले होते कीथोडा सावध रहा, काळजी घे. बाबाजी शेतात गेल्यानंतर दूरवर पाहिले. पण त्यांना काही जाणवले नाही. शेताच्या बांधावर उभे राहिल्यानंतर. सरित येणारे पाणी पाहत असताना.

सात ते आठ फुटावर असलेल्या सरीत झोपलेले बिबटे ताडकन उभे राहिले. याबाबत बाबाजी खानदेशे म्हणालेमाझी व बिबट्यांची नजरा नजर झाली. माझ्याकडे ते पाहत होते. त्यांना पाहूनअंगाचा थरकाप उडाला. देवाचं नाव घेत मी हळूहळू मागे पावले टाकत राहिलो. बिबटे मात्र जागेवर उभे राहून माझ्याकडेच पाहत होते. थोडं अंतर आल्यानंतर मी पळत घरी आलो. घामाघुन झालो होतो. माझी एकंदरीत परिस्थिती पाहून ताबडतोब पत्नी रत्नानेदिलेले पाणी मी पिलो . सर्व प्रसंग सांगितला.

दरम्यान आजूबाजूच्या लोकांना मोबाईल द्वारे सूचना करून सावध राहण्याविषयी कळविले आहे. मंचर चे वनपाल संभाजीराव गायकवाड व वनरक्षक पूजा कांबळे यांनाही कळविले आहे. असे बाबाजी खानदेशे यांनी सांगितले.

# अपहरण केल्याचे सांगत सरकारी यंत्रणेचा गैरवापर; तरुणावर शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**शिरूर । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील टाकळी हाजीगावातील होनेवाडी परीसरातील एका तरुणाने खोटी माहिती देत पोलिस यंत्रणेचा गैरवापर केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० एप्रिल रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास डायल ११२ या आपत्कालीन सेवेला खोटा कॉल करून खळबळ उडवून दिली.**

प्रसाद भानुदास देशमुख (वय २६, रा. नारायणगाव, ता. जुन्नर) असं इछड २१२(र) नुसार अदखलपात्र गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.




याबाबत पोलीस नाईक संतोष सुभाष बनसोडे (वय ३३ वर्ष ) शिरूर पोलीस स्टेशन यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी प्रसाद देशमुख याने आपल्या मोबाईलवरून गौरव हारदे (रा. राहुरी) या आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला फोन करून, मला शेतकरी नवनाथ शंकर होणे व इतर आठ जणांनी किडनॅप केले आहे. माझ्याकडे ते पाच लाख रुपयांची मागणी करत आहेत, अशी खोटी माहिती दिली. या माहितीवर विश्वास ठेवून आरोपीच्या कंपनीतील सहकारी पंकज शिंदे (रा. नारायणगाव) यांनी डायल ११२ वर कॉल करून पोलिस यंत्रणेला चुकीच्या दिशेने वळवले.

मात्र, पोलिसांच्या तात्काळ तपासात हे सर्व प्रकरण खोटे असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकारामुळे सरकारी यंत्रणेचा वेळ व संसाधनांचा गैरवापर झाला असल्याने आरोपीवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. याबाबत शिरूर पोलिसांकडून या घटनेचा अधिक तपास सुरू असून, खोट्या माहितीवर आधारित अशा प्रकारांबाबत सर्वसामान्य नागरिकांनी सावध राहावे, अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, असे आवाहन शिरूर पोलिसांनी केले आहे.

# फुले सिनेमा आहे तसा दाखवा, नाहीतर...; प्रकाश आंबेडकरांना दिला थेट इशारा, मुख्यमंत्र्यांना म्हणाले...

नुकताच महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित 'फुले' या हिंदी सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. मात्र, या सिनेमातील काही सीन्सवर सेन्सॉर बोर्डाने कात्री लावली असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे आता यावरुन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर चांगलेच आक्रमक झाले असून त्यांनी याचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविला आहे.

तसेच मुख्यमंत्र्यांना थेट आवाहन करत फुले सिनेमा जसा आहे तसा दाखवला नाही, तर तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित फुले सिनेमाची तारीख पुढे ढकलल्यानंतर पुण्यात वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाली आहे.

महात्मा फुले यांच्या कार्याच्या बाबत असलेले फुले सिनेमातील काही सीन काढण्याचे आदेश दिले आहेत. शासनाला आम्ही सांगतो की महात्मा फुले यांचे वांगमय प्रकाशित करण्यात आले आहेत. शासनाशी आम्ही सहमत नसल्याचे म्हणत प्रकाश आंबेडकरांनी सेन्सॉर बोर्डाचा निषेध नोंदविला. ज्योतिबा फुले आणि सावित्रीमाई यांचा अपमान आम्ही सहन करणार नसल्याचे ते म्हणाले. पुण्यातील फुले वाड्याच्या बाहेर वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आणि अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी निषेध नोंदविला.



सिनेमा टॅक्स फ्री करावा

मुख्यमंत्री यांना आवाहन आहे की एका बाजूला अभिवादन करताय आणि दुसऱ्या बाजूला सिनेमाला विरोध करत असाल, तर विरोधाभास नको, असे आंबेडकर म्हणाले. सिनेमा आहे तसा दाखवला पाहिजे, नाहीतर सेन्सॉर बोर्डाच्या कार्यालयावर धाव घेतल्याशिवाय राहणार नसल्याचे आंबेडकर म्हणाले आहेत. यावेळी महाराष्ट्र सरकारने फुले सिनेमा टॅक्स फ्री करावा अशी मागणी करण्यात आली.

# शिरुर–आंबेगावातील वस्तीविकासासाठी १ कोटी ४१ लाख रुपये मंजूर

मंचर : माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून शिरुर–आंबेगाव विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील मागासवर्गीय वस्तीच्या विकासासाठी १ कोटी ४१ लाख रुपये मंजूर करण्यात आले,अशी माहिती आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे अध्यक्ष विष्णूकाका हिंगे यांनी दिली.



पुणे जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागांतर्गत २० टक्के जिल्हा परिषद निधी २०२४–२५ मधून मागासवर्गीय वस्ती येथे रस्ते बांधकाम करण्यासाठी पुढील गावांना निधी मंजूर करण्यात आला. अवसरी बुद्रुक कोळीआळी येथे रस्ता काँक्रिट ८ लाख ५० हजार रुपये. अवसरी बुद्रुक जाधववस्ती ते दूध डेअरी रस्ता काँक्रिट ८ लाख ५० हजार रुपये.लोणी – पंचरासवस्ती येथे रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये. टाव्हरेवाडी येथे भिल्लवस्ती रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये.जारकरवाडी लोलेवस्ती ते ढोबळेवाडी रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये.गावडेवाडी माथावस्ती शिव रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये.काठापूर बुद्रुक वेस ते नदी बंधारा रस्ता ८ लाख रुपये.ठाकरवाडी (चास) येथे पिराचीवाडी रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये.जारकरवाडी काकडेमळा रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये.शिंगवे सोनवणेवस्ती क्र. २ ते जल शुद्धीकरण प्लांट रस्ता काँक्रिट ८ लाख ५० हजार रुपये.चांडोली बुद्रुक कान्होबा मंदिर ते नदी बंधारा जोडरस्ता ८ लाख ५० हजार रुपये.अवसरी खुर्द येथे प्रा.आ.केंद्र ते बौद्धवस्ती रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये.जांभोरी तिटकरेवस्ती रस्ता काँक्रिट ५ लाख रुपये रुपये.जांभोरी लिंबोनेचीवाडी रस्ता काँक्रिट ३ लाख रुपये.फुलवडे येथील मोहरेवाडी ते स्मशानभूमी रस्ता काँक्रिट ५ लाख रुपये.तिरपाड अंतर्गत नानवडे – ढकेवाडी येथे समाजमंदिर बांधणे ७ लाख रुपये रुपये.टाकळी हाजी ता.शिरुर येथे आपटेवस्ती रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये रुपये.पिंपरी दुमाला ता.शिरुर येथील अमोल डोळस घर ते शेलार घर रस्ता काँक्रिट ६ लाख रुपये. पिंपळे खालसा ता.शिरुर येथे रामगुडेवस्ती रस्ता काँक्रिट ८ लाख रुपये रुपये या प्रमाणे निधी मंजूर झाल्याचे सांगण्यात आले.

# तरुणाच्या त्रासामुळे अल्पवयीन मुलीने संपवलं आयुष्य

**बारामती । प्रतिनिधी**

**चार तरुणांच्या असह्य त्रासामुळे बारामती तालुक्यातील कोर्हाळे खुर्द येथील एका अल्पवयीन मुलीने गळफास घेऊन आपले जीवन संपविले. मंगळवारी (दि. ८) ही घटना घडली. विशाल गावडे, प्रवीण गावडे, शुभम गावडे व सुनील खोमणे (सर्व रा. कोर्हाळे खुर्द, ता. बारामती) या आरोपींविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.**

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला त्रास दिला गेला. तू माझ्याशी लग्न कर; अन्यथा तुझ्या घरातील लोकांची मुंडकी कोयत्याने उडवून टाकीन, अशी धमकी तिला देण्यात आली. या कारणावरून तिने राहत्या घरात लोखंडी अँगलला ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली. वडगाव निंबाळकर पोलिसांनी या चार तरुणांविरुद्ध बालकांचे लैंगिक अपराधापासून सरंक्षण, आत्महत्येस प्रवृत्त करणे, शस्त्र अधिनियम, अ‍ॅट्रॉसिटी आदी कलमान्वये गुन्हा दाखल केला.

मयत मुलीच्या वडिलांनी याप्रक?णी फिर्याद दाखल केली. मंगळवारी (दि. ८) पीडित मुलीने



राहत्या घरामध्ये गळफास घेत आत्महत्या केली. मयत मुलीने सप्टेंबर २०२४ मध्ये आई–वडिलांना गावातील विशाल गावडे हा मी शाळेत ये–जा करत असताना त्याच्या मित्रांसह मोटारसायकलवरून पाठलाग करतो.

त्याचे मित्र प्रवीण, शुभम व सुनील यांना तो ही माझी बायको आहे, असे म्हणून मला चिडवतो. तर त्याचे हे मित्र मला वहिनी म्हणून चिडवत असल्याची माहिती दिली होती. मुलीच्या आई–वडिलांना विशाल यास मुलीला त्रास देऊ नको, असे बजावले होते. त्यानंतरही तो तिला मोबाईलवर मेसेज करत होता.

२८ फेब्रुवारी रोजी तिने इन्स्टाग्रामवरून विशालला मला कसले ही मेसेज करत जाऊ नको, असा मेसेज पाठवला. त्यावर त्याने शिवीगाळ केली होती. त्यातून ही मुलगी दडपणाखाली आली होती. २७ मार्चपासून ती सोमेश्वरनगरच्या एका अ‍ॅकॅडमीत कोर्ससाठी जात होती. २ एप्रिल रोजी तिने घरच्यांना सांगितले की, मी सोमेश्वरला जात असताना विशाल हा पाठीमागून आला.

मी गावात एक वर्षापूर्वी कोयत्याने वार केले आहेत, तू जर माझ्याशी बोलली नाही, तर तुझ्या घरातील कोणालाही जिवंत ठेवणार नाही, सर्वांची कोयत्याने मुंडकी उडवीन, अशी धमकी दिली. तो गावामध्ये मोटारसायकलवर फिरत असताना त्याच्या मित्रासह फेर्या मारत होता. त्यामुळे ही मुलगी अधिकच घाबरली होती.

७ एप्रिल रोजी दुपारी तीनच्या सुमारास तिला विशालने लग्न कर; अन्यथा तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही, गावच्या यात्रेपूर्वी तुला लग्न करावे लागेल, अशी धमकी दिली होती. कुटुंबीयांनी या वेळी मुलीला समजावून सांगितले होते. मंगळवारी (दि. ८) मात्र तिने हा त्रास असह्य झाल्याने गळफास घेत आत्महत्या केली. उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड याप्रक?णी अधिक तपास करत आहेत.

# सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटतर्फे तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील 'टेकफेस्ट–२०२५' महोत्सवाचे आयोजन

पुणे: सूर्यदत्त इन्स्टिट्यूट्स ऑफ मॅनेजमेंटच्या एमसीए व एमबीए विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील टेकफेस्ट–२०२५चे आयोजन करण्यात आले होते. समाजाच्या कल्याणासाठी तांत्रिक प्रगतीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित हा तीन दिवसीय राष्ट्रीय महोत्सव 'सूर्यदत्त'च्या बन्सीरत्न सभागृहात नुकताच यशस्वीपणे पार पडला.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, डिजिटल स्ट्रॅटेजिक अडवायझर सिद्धांत चोरडिया, मुख्य कार्यकारी अधिकारी व समूह संचालक डॉ. शैलेश कासंडे, अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रतीक्षा वाबळे, संचालक प्रा. डॉ. मनीषा कुंभार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, प्राचार्य, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, निमंत्रित अतिथी, सहभागी



उत्साही विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

या महोत्सवामध्ये 'मास्टर अँड मिस टेक्नोक्रॅट्स', 'माईंडस्वीपर', 'बॅटल विथ कोड', 'डिझाईन फायर', 'गेम ग्लायडर', 'सस्टेनप्रेन्युअर', 'बिझनेस लिंगो', 'लीग ऑफ लीडर्स' व 'मास्टर अँड मिस मॅनेजर' अशा नऊ वैविध्यपूर्ण स्पर्धा घेण्यात आल्या. देशभरातील ४० इन्स्टिट्यूट्समधील ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. स्पर्धेतील नोंदणी ते निकाल जाहीर करण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया विनासायास पार पाडण्यासाठी 'ईआरपी' प्रणाली वापरण्यात आली. उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पारितोषिके संस्थेतील व बाह्य स्पर्धकांसाठी स्वतंत्र गटांमध्ये विभागली गेली होती. संस्थेतील प्राध्यापक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, विश्लेषणात्मक आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करण्यासह नवोन्मेष आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने हा महोत्सव उपयुक्त ठरला. शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रातील दरी कमी करण्यासाठी 'टेकफेस्ट'सारखे शैक्षणिक उपक्रम महत्वाचे आहेत. विद्यार्थ्यांमध्ये प्रोग्रामिंग आणि समस्या सोडवण्यासाठीची कौशल्ये विकसित होण्याला प्रोत्साहन मिळते. सखोल नियोजन आणि प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे हा कार्यक्रम यशस्वी ठरला. यासह विद्यार्थ्यांनी टीमवर्क, सहकार्य भावना आणि प्रकल्प व्यवस्थापनाच्या क्षमता विकसित करण्याचे ज्ञान आत्मसात केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष संगणकीय आव्हानांवर केला, ज्यामुळे त्यांना मौल्यवान अनुभव आणि उद्योगाशी संबंधित परिस्थितींचा प्रत्यक्ष परिचय मिळाला. 'सूर्यदत्त'मध्ये अशा प्रकारच्या उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन दिले जाते.

# पुणे पीएमपी बसेसमध्ये 'एआय'चे कॅमेरे, विना तिकीट असणाऱ्यांचा संदेश जाणार, अपघात रोखणार

पुणे शहरातील सार्वजनिक वाहतुकीसाठी पीएमपीएमएल म्हणजे पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड महत्वाची संस्था आहे. लाखो पुणेकर या सेवेचा लाभ घेत असतात. पीएमपीएमएलकडून प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न असतो. तसेच सुरक्षित प्रवास करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. पीएमपी बसने आणखी एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. आता लवकरच पीएमपी बसमध्ये एआयवर आधारित कॅमेऱ्यांचा वापर केला जाणार आहे. या प्रस्तावास मंजुरी मिळाल्यास पीएमपीएमएल एआयचा वापर करणारी देशातील पहिली प्रवासी वाहतूक संस्था असणार आहे.




पुण्यातील पीएमपी बसमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) असणारे कॅमेरे लावण्यात येणार आहे. त्यातील एक कॅमेरा बसच्या स्टिअरिंगजवळ लावण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून चालकावर देखील लक्ष ठेवता येणार आहे. पीएमपी बसचे काही अपघात चालकांच्या चुकांमुळे झाले आहेत. तसेच काही चालक वाहतूक नियमांचे पालनही करत नाही. त्यामुळे या सर्व गोष्टींवर एआय कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

पुणे शहरातील अनेक मार्गावर प्रवाशांची मोठी गर्दी असते. या गर्दीचा फायदा घेऊन काही प्रवाशी विनातिकीट प्रवास करतात. त्यामुळे बसमध्ये बसवण्यात येणारे एआय कॅमेरे प्रवाशांची संख्या मोजून त्याचा संदेश वाहकाला देतील. बसमध्ये किती तिकीट काढले गेले आणि किती प्रवाशी आहेत त्याची माहिती वाहकाला मिळणार आहे. त्यामुळे बसमध्ये विना तिकीट असणाऱ्यांची माहिती वाहकाला दिली जाईल.

cmyk